# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २७/१२/२००७

**लालबहाद्दुर शास्त्री स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,**
दि. २७/१२/२००७

आज गुरूवार दि. २७/१२/२००७ रोजी स्थायी समितीची सभा सुचना क्र. ०५ दि. १९/१२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहाद्दुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी ११.०० आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी **मा. सभापती, श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स** हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ७) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ८) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| ११) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १२) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १३) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १४) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| २) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सदस्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन सचिवांनी आजच्या सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला लाल बहादूर शास्त्री सभागृह, स्थायी समिती सभा सुचना क्र. ०५, दि. १९/१२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विचार विनिमय करणेकरिता आयोजित करण्यांत येत आहे.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, मला एक अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे. गुजरात मधील भारतीय जनता पार्टीचे सरकार आणि नरेंद्र मोदी यांची मुख्यमंत्रीपदी नियुक्ती झाली आणि त्यांची शपथविधी झालेला आहे. पंतप्रधानांनीसुद्धा त्यांचे अभिनंदन पाठवलेले आहे म्हणून आपण आपल्या मा. स्थायी समितीतर्फे त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करुन त्यांना पाठवावा असा मी ठराव मांडत आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ०६ :-**

गुजरात मधील भारतीय जनता पार्टीचे सरकार आणि नरेंद्र मोदी यांची मुख्यमंत्रीपदी नियुक्ती झाली आणि त्यांची शपथविधी झालेला आहे. पंतप्रधानांनीसुद्धा त्यांचे अभिनंदन पाठवलेले आहे म्हणून आपण आपल्या मा. स्थायी समितीतर्फे त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करुन त्यांना पाठवावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील.      अनुमोदक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, पाणी पुरवठा विभागाच्या कामकाजाचा आढावा घेणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब मागच्या सभेमध्ये बारवे डॅममधून ३० एम.एल.डी. पाणी मिळणार आहे. त्याची कार्यवाही कुठंपर्यंत झालेली आहे? काय अडचण आहे? कारण आज शहरामध्ये पाण्याची टंचाई आहे. मागच्या मिटींगमध्ये आपण बोलले होते की, पुढच्या मिटींगमध्ये पहिला विषय आपण हाच घेउ. आपण पाण्याचा आढावा घेतो त्यामध्ये तो विषय नाही. तर त्या ३० एम.एल.डी. पाण्याबद्दल आणि झालेल्या कार्यवाहीबद्दल प्रथम चर्चा व्हावी. तो विषय कुठे अडकलेला आहे? कशामुळे अडकलेला आहे? कारण मा. आयुक्त साहेबांच्या चेंबरमध्ये दिवाळीपूर्वी मी ज्यावेळेस गेलो. तेव्हा त्यांनी स्वतः आम्हाला सांगितले की, पाच दिवसामध्ये ती ३० एम.एल.डी. पाणी शहरामध्ये येते. दिवाळी गेली, ख्रिसमसही गेलेला आहे. तर याच्यावर कुठे अडचण आहे याची जरा चर्चा होउ द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, दोन दिवसापासून पेपरमध्ये बातम्या येतात की, एम.एम.आर.डी.ए. ने आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेला काहीतरी कर्ज किंवा अनुदान दिले आहे. म्हणजे मुंबई महानगरपालिकेच्या व्यतिरिक्त ज्या महानगरपालिका आहेत. त्यांना एम.एम.आर.डी.ए. ने अनुदान दिले किंवा लोन दिले आहे. याबद्दल आपल्याला काही माहिती आहे का? आणि आपला जो रेल्वे ब्रिज आहे. त्याच्यावर सुद्धा एम.एम.आर.डी.ए. ने पुल मंजुर केलेला आहे. तर याबाबत प्रशासनाला काही माहिती आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रथम पाण्याबद्दल जो विषय मी विचारलेला आहे. मा. आयुक्तांनी स्वतः सांगितले आहे की, दिवाळीच्या आधी मी पाणी आणतो आणि शहरामध्ये अनेक बोर्ड, पोस्टर लावले की, ३० एम.एल.डी. पाणी आले. हे सर्वांना माहित आहे. आणि मागच्या मिटींगमध्ये जेव्हा मी हा विषय काढला तेव्हा सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांना सांगितले होते की, चेअरमन साहेबांनी पुढच्या सभेत घेतो म्हणून सांगितले तर तुम्ही बसा. त्यावेळेस मी बसलो. ३० एम.एल.डी. पाणी का थांबलेले आहे याबद्दल तुम्ही आज आम्हाला संपूर्ण माहिती द्या.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आपण गेल्या वेळेला बोलले की, हा विषय आपण पुढच्या सभेला घेउ या. तेव्हा मी सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना सांगितले की, आत्ता बोलू नका. तो विषय घ्यायचा असे मा. सभापतींनी सांगितले आहे. आमचा मा. सभापतींवर पूर्ण विश्वास आहे. तो विषय ते घेतील पण तो विषय का आला नाही?

**मा. सभापती :-**

पाण्याचा विषय असेल तर ते घेतील असे मला वाटले. पण तो गोषवारा असा आला. पण काही हरकत नाही. आपण याच्याबद्दल चर्चा करू शकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग खुलासा करावा. आत्ता तुम्ही निर्णय घेणार का?

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण चर्चा करणार. पण विषय असल्यानंतर त्यांचे गांभिर्य वेगळे होते आणि तो विषय नसेल त्याच्यावर निर्णय होईल का?

**एस. ए. खान :-**

त्याच्यावर ऑलरेडी निर्णय आहे.

**शरद पाटील :-**

हा विषय घेतला नाही आणि आपण चर्चा करणार.

**एस. ए. खान :-**

पैसे वगैरे द्यायचे बाकी आहे. तर वसुली साठीच हा विषय आहे की, किती वसुली झाली?

**शरद पाटील :-**

तो विषय नाही. ३५ एम.एल.डी. का विषय है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ती योजना आलेली आहे. कुठे जॉईन्ट मारायचे आहे? किती पैसे भरायचे आहेत? वॉटर डिपार्टमेंटने गोषवारा दिला आहे की नाही?

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल साहेब, या योजनेबद्दल सर्वांना माहिती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जो माहिती मांग रहे है, वो सभागृह मे देने दो। हम कहाँ बोल रहे है की, पैसा भर दिजिए। पैसा भरने का प्रस्ताव भी नही है। हमे माहिती दो की क्यो अटक है? पाणी डिपार्टमेंटने वो टिप्पणी भेजा है की नही की, इतना पैसा भरना है। पाणी डिपार्टमेंटने टिप्पणी ही भेजा नही। तो विषय आने का सवाल नही है। अगर पानी डिपार्टमेंटने टिप्पणी भेजा है तो वो टिप्पणी कहाँ अटका है? क्यो अटका है? उसका कुछ खुलासा तो होना चाहिए।

**मा. सभापती :-**

या लोकांनी मला माहिती दिलेली की, आपले पाणी पास झालेले आहे. परंतु, आपल्याकडे फन्ड जमा नसल्या कारणाने आपल्याला पैसे भरता येत नाहीत. याच्यासाठी आपल्याकडे फिक्स डिपॉझीट आहेत ते तोडायला लागणार आहेत. त्यात आपले नुकसान होणार आहे. मी सांगितले की, आत्ता डिसेंबर जाउ द्या. डिसेंबर नंतर आपल्याला जानेवारीमध्ये काय करायचे असेल ते करू. लोन घेउ किंवा फिक्स डिपॉझीट तोडू. मा. महासभेत हा विषय घ्यायला लावू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, लॉस हा शब्द आपल्याला या सभागृहामध्ये शोभत नाही.

**मा. सभापती :-**

लॉस कुठे झाला?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही बोलता की, एफ.डी तोडण्यामध्ये लॉस. जेव्हा हा पाण्याचा महत्वाचा विषय आहे. जेव्हा शहरामध्ये पाण्याची टंचाई आहे आणि अडीच कोटी रूपये फार मोठी रक्कम नाही. यापुर्वी अनेक एफ.डी. तोडलेल्या आहेत. साध्या कारणासाठी तोडलेली आहे. एक तर त्यांनी टिपणी दिलेली आहे. टिपणी दिल्यानंतर ऑडीटरने पैसे नाहीत याच्यावर काही रिपोर्टींग केली आहे का? इकडे पुर्ण गोष्ट येउ द्या. त्याच्यामध्ये कोण दोषी आहे? म्हणजे ऑडीटर सांगतो की, याच्यामध्ये नुकसान होणार आहे. त्यांचे म्हणणे आहे का?

**मा. सभापती :-**

ऑडीटरच ठिकाण्यावर नाहीत. तर ऑडीटर काय सांगणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण नेमणूक केली आहे त्यांनी बोलावे मा. आयुक्तांनी त्याच्यावर नकार दिला असेल. ऑडीटरने नकार दिला असेल. लॉस होणार आहे. शेवटी काही योजना आपण लॉसमध्ये चालवतो. शेवटी आपल्याला लोकांना न्याय द्यायचा आहे. सोयीसुविधा देणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. फक्त या विषयाचे गांभिर्य तुम्ही समजून घ्या. आमचा काही उद्देश नाही. पोस्टर्स लावले की, पाणी यांनी आणले. पण पाणी आलेच नाही आणि आज पाणी नाक्यावर आलेले आहे. फक्त पैसे भरून आपल्या शहरामध्ये आणायचे आहे. त्यामध्ये कुठलाही विघ्न कोणी टाकत असेल किंवा राजकिय दिशेने कोणी करत असेल तर बरोबर बाब नाही. म्हणून आम्हाला लेखापाल किंवा आत्ताचे ऑडीटर जे कोणी असतील त्यांच्याकडे टिपणी आलेली आहे का? त्यांनी टिपणी दिली आहे का? त्याच्यावर वॉटर डिपार्टमेंटने काय केलेले आहे? आम्हाला खुलासा द्या. आज पाण्यावर चर्चा आहे. मग आम्हाला खुलासा द्या. लॉस होत असेल तर लेखापालाने सांगावे.

**मा. सभापती :-**

ऑडीटर श्री. बनसोडे यांनी मला सांगितलेले की, असा प्रकार आहे. आपल्याकडे फन्ड जमा नाही तर काय करायचे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या दिवशी श्री. बनसोडे साहेब गेले त्यादिवशी हा विषयच नव्हता.

**मा. सभापती :-**

चर्चा झालेली आहे. विषयाचा प्रश्न कुठे येतो?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता जे अधिकारी आहेत ते आत्ता सांगू द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, ३० एम.एल.डी. पाण्याच्या संदर्भात तुम्ही बांधकाम विभागात.....

**मा. सभापती :-**

या जानेवारी महिन्यात आपण पास करून घेणार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याची पोझीशन काय आहे? त्याचे स्टेटस काय आहे? त्या अधिका-यांनी निवेदन करावे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, जानेवारी महिन्यामध्ये २०टक्के पाणी कपात होणार आहे ही बाब सत्य आहे का? त्याचा आपण खुलासा करावा.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आत्ता सन्मा. सदस्या ज्योत्स्ना हसनाळे यांनी प्रश्न केला की, २० टक्के पाणी कपात होणार आहे का? याबाबतीत आपल्याला आजपर्यंत अधिकृतरित्या काही कळविण्यात आलेले नाही. परंतु, जी माहिती आहे, ती वर्तमानपत्रात आणि काही अधिकाऱ्यांकडून मिळालेली आहे. ती २० टक्के पाणी कपात पुर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये करण्याचा निर्णय इरिगेशन डिपार्टमेंट आणि संबंधित विभागाचा झालेला आहे. आपल्याकडे अद्यापपर्यंत लेखी काही प्राप्त झालेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी तो निर्णय कशामुळे घेतला?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

क्ष्यांनी तो निर्णय कशामुळे घेतला हे त्या बैठकीला आपल्याला बोलावले नव्हते. आमच्याकडे जी माहिती आहे तीच माहिती मी तुम्हाला सांगितली त्यांनी कशामुळे निर्णय घेतला का घेतला हे आपण सांगू शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण त्यांच्या बैठकीमध्ये जो निर्णय झाला तो निर्णय कशामुळे झाला याची काहीतरी कल्पना तुम्हाला आली असेल.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

तो त्यांचा बराच मोठा इश्यु आहे. कृष्णा पाणी वाटप तंटा आहे. त्याच्यावर त्यांनी निर्णय घेतलेला आहे असे फक्त औपचारीकरित्या कळते. आपल्याकडे लेखी काही नाही. आपल्याला मिटींगला बोलावले नव्हते ही वस्तुस्थिती आहे. हा पहिला भाग आत्ता दुसरा भाग सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी विचारले की, ३५ एम.एल.डी. पाण्याचे काय झाले? त्या पाण्याबाबतची वस्तुस्थिती अशी आहे की, ३० एम.एल.डी. पाणी एकदम येणार नाही. आपण काम केले आहे. पहिल्या टप्प्यात पाच ते दहा एम.एल.डी. पाणी येणार ते महिना दिड महिना चालणार कारण एम.आय.डी.सी. ची लाईन आहे. ते सुद्धा स्टेमबद्दल साशंक आहेत. त्याच्यानंतर महिना दिड महिन्याने दहा एम. एल. डी. पाणी येणार. असे टप्प्या टप्प्याने ३० एम.एल.डी. पाणी येणार आहे. आणि कापूरबावडी येथे पुलाच्या खालून आपण पाईपलाईन टाकलेली तिथे पंप बसवलेला आहे. आत्ता फक्त टॅपिंगचे काम बाकी आहे. आणि त्या संदर्भात एम.आय.डी.सी. ने जसे आपण नवीन नळ कनेक्शन पास करतांना पंचवीस हजार रूपये डिपॉझीट घेतो. तशा एम.आय.डी.सी च्या ज्या अटीशर्ती होत्या त्यांना दि. १६/०४/२००७ रोजीच्या मा. महासभेत याला मान्यता दिलेली आहे आणि एम.आय.डी.सी ने पैसे भरण्याबाबत आपल्याला कळविलेले आहे. आणि ते पैसे भरले आणि टॅपिंग झाले की ५ ते १० एम.एल.डी. ....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किती रूपये?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

दोन कोटी बावन्न लाख रूपये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याबद्दल आपल्या डिपार्टमेंटकडून आपण काय कार्यवाही केली?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

दोन कोटी बावन्न लाख रूपये भरण्याबाबतचे एम.आय.डी.सी. चे पत्र आपल्या पालिकेला चार डिसेंबरला आलेले आहे. तद्नंतर चार तारखेलाच आम्ही रिपोर्ट करून ऑडीट आणि अकाउन्टट कडून मा. आयुक्त साहेबांकडे मान्यता झालेली आहे. आणि हे पैसे पाणी पुरवठा राखिव निधीतून भरायचे असल्याकारणाने त्या एफ.डी. मुदतीपुर्व तोडायच्या आहेत. त्यामुळे तो विषय लेखा शाखेने मा. आयुक्त साहेबांनी सचिव कार्यालयाकडे दिलेला आहे की, दोन कोटी बावन्न लाख आपल्या रेग्युलर फंडात नाहीत. त्यासाठी एफ.डी. तोडावी लागेल. ही परिस्थिती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सचिव साहेब, आत्ता तुमच्याकडे चार तारखेला प्रस्ताव आलेला आहे बरोबर ना?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

११/१२ तारखेला तो प्रस्ताव त्यांच्याकडे गेलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि आज सत्ताविस तारिख आहे. म्हणजे पंधरा दिवस झाले. त्याच्यामध्ये आपल्या दोन मिटींग नक्कीच झालेल्या आहेत. आपण हा प्रस्ताव मा. महासभेमध्ये किंवा मा. स्थायी समितीमध्ये न आणण्याचे कारण काय?

**मा. सभापती :-**

मी त्यांना सांगितले होते की, एफ.डी. तोडायची किंवा कसे? आणि आपले किती नुकसान होते याचा आढावा घेउन ठेवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, त्या गोष्टीचा आढावा सचिव घेणार नाही. सचिवांना ऑडीटरने पत्र दिल्यानंतर त्यांनी विषय आणायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

मी ऑडीट वाल्यांना सांगितले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिवांनी मा. स्थायी समिती सभेमध्ये विषय आणायला पाहिजे होता एफ.डी. तोडायची किंवा नाही हा निर्णय मा. स्थायी समितीचा आहे. आम्हाला फक्त एवढेच पाहिजे की, पंधरा दिवस सचिवांनी हा विषय का अडवून ठेवला?

**मा. सभापती :-**

अडवून ठेवलेला नाही. त्यांना मी सांगितलेले की, आपल्याकडे पैसे नसल्याकारणाने पहिल्यांदा टॅक्स वसुलीचे रिव्ह्यु करायचे याच्या नंतर आपल्याला हे विषय मांडायचे आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिवांनी हा विषय पंधरा दिवस आपल्याकडे का ठेवला? ते नेहमी बोलतात की, आमच्याकडे टिप्पणी आलेली नाही मी काय करू? डिपार्टमेंटने टिपणी दिली नाही मी काय करू? पंधरा दिवसापुर्वी डिपार्टमेंटने त्यांना टिप्पणी दिली होती. त्याचे कारण सचिवांनी सांगावे. श्री. बनसोडे आणि मा. आयुक्त साहेबांनी पाठविले की, एफ.डी. तोडायची. एफ.डी. तोडायची किंवा नाही हा विषय मा. स्थायी समितीचा आहे. इकडे निर्णय झाला असता. याच्यापुर्वी सर्व निर्णय इकडे झालेले आहेत.

**मा. सभापती :-**

आपण काय निर्णय करायचा असेल तो करू या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो प्रस्ताव तुम्ही आणलाच नाही तर तुम्ही निर्णय काय घेणार.

**मा. सभापती :-**

मी तुम्हाला सांगतो की, जानेवारीमध्ये पाणी येणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्हीच सांगितले होते की, इलेक्शनच्या अगोदर पाणी येणार. आत्ता इलेक्शन झाले. तुमची निवड झाली. सगळ्यांची निवड झाली. पण पाणी आलेले नाही. मग तुम्ही आत्ता कसे बोलता की, जानेवारीमध्ये पाणी येईल.

**मा. सभापती :-**

आपण पैसे भरले तरच येणार.

**शरद पाटील :-**

साहेब, तोच पैसे भरायचा विषय का लेट होतो?

**ध्रुवकिशारे पाटील :-**

तो विषय आला पाहिजे. मग डिले का होतो? त्यांनी सचिवांनी प्रश्न विचारला आहे. मग त्यांनी तसे उत्तर द्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिवांनी उत्तर द्यावे की, त्यांनी पंधरा दिवस का अडवून ठेवलं?

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आज या शहरामध्ये पाण्याची परिस्थिती इतकी खराब आहे आणि लोक विचारतात की, ३० एम.एल.डी. पाणी आले, बोर्ड लागले, सगळे झाले. लोक आम्हाला विचारतात की, बोर्ड लगा गया। पाणी आया। नए साल का तोहफा मिल गया पाणी येतच नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील आणि सर्व सन्मा. नगरसेवकांना सांगतो की, ५० एम.एल.डी. पाणी आले तरी तेच रडणे राहणार आहे. त्याने काहीच फरक पडणार नाही.

**शरद पाटील :-**

साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत. पण तरीसुध्दा जे पाणी येणार आहे. त्याचे आपण बॅनर लावले, पोस्टर लागले, सगळे झाले आणि ते पाणी येत नाही. तर नागरिक आम्हाला प्रश्न विचारतात. लोकप्रतिनिधी म्हणून ते आम्हाला प्रश्न विचारतात की, आज पाणी इतना है, फिर भी हम लागो को पानी क्यो. नही आता है। पानी कहाँ जाता है।

**ध्रुवकिशारे पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही बोला.

**नगरसचिव :-**

सदरचा विषय ११ डिसेंबरला प्रशासनाकडून माझ्याकडे आला होता. सदरचा विषय आल्यानंतर मी मा. सभापतींना दाखवल्यानंतर मा. सभापतींनी मला असा आदेश दिला की, कोणते विषय घ्यायचे आणि नाही घ्यायचे हे पिठासीन अधिकारी म्हणून त्यांचे अधिकार आहेत. त्यांनी ह्या विषयाबाबत सुचना दिली की, या विषयाबाबत जानेवारी पूर्वी पाण्याची काय स्थिती आहे याचा आढावा घेईन. नंतर हा विषय आपण जानेवारीच्या पहिल्या आठवड्यामध्ये घेउ.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही तशी नोंद करा आणि मा. सभापतींना तुम्हाला जर असे सांगितले असेल तर या गोष्टीचे फार गांभीर्य आहे. आजची जी पाण्याचा आढावा घेण्यासाठी मिटींग लावलेली आहे. आम्ही भारतीय जनता पार्टीचे दोन्ही सदस्य आणि आमचे मित्रपक्ष जे निर्णय घेतील. आम्ही निर्णय घेतो की, या पाण्याच्या आढाव्यामध्ये, चर्चेमध्ये आम्ही भाग घेणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही असे बोला की, जोपर्यंत तुम्ही याचा खुलासा करत नाही की, मिटींग केव्हा घेणार? आणि हा विषय कोणत्या मिटींगमध्ये घेणार तोपर्यंत आम्ही तुम्हाला पुढची मिटींग चालवू देणार नाही. तुम्ही फक्त सांगा की पुढच्या मिटींगमध्ये आम्ही विषय घेतो.

**मा. सभापती :-**

तुम्ही मिटींग चालवा किंवा नका चालवू. मिटींग चालवण्याचे माझे कर्तव्य आहे. पाच माणसे असतील तरी मी मिटींग चालवणार आहे.

**नयना म्हात्रे :-**

मिटींग चालवणार नाही असे बोलू नका.

**शरद पाटील :-**

शहराला पाणी नको आहे का? मग हा विषय का घेत नाही? पुढच्या मिटींग घेतो म्हणून सांगितले मग का घेतला नाही?

**एस. ए. खान :-**

का घेतला नाही ते त्यांनी सांगितले.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेबांचे वाचन आम्ही चांगले मानतो आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही काही बोललो नाही. मी सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना सांगितले की, मा. सभापतींनी पुढच्या मिटींगमध्ये विषय घेतो म्हणून सांगितले. म्हणून त्यांना मी बसवले.

**ध्रुवकिशारे पाटील :-**

साहेब, तुम्ही सांगा की, जानेवारीच्या पहिल्या आठवड्यामध्ये या मिटींगमध्ये मी विषय घेतो.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

ते तसेच चालते. आम्ही हा विषय बोलतो तो गंभीर विषय आहे.

**नयना म्हात्रे :-**

जानेवारीमध्ये पैसे भरुन आपल्याला पाणी मिळेल. आता जानेवारीला शिंगा राहिले आहे का?

**मा. सभापती :-**

याच्या पुढच्या मिटींगला मी विषय घेतो. जानेवारीला मी पैसे भरुन तुम्हाला पाणी देतो.

**ध्रुवकिशारे पाटील :-**

सचिव साहेब, मा. सभापतींनी सांगितले की, पुढच्या मिटींगला हा विषय आणायचा. तुम्हाला आणखी कोणती मंजुरी पाहिजे का? मग आत्ताच मंजुरी घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्यावेळी पण सांगितले होते. पण तुम्ही घेतला नाही.

**शरद पाटील :-**

मा. सभापती म्हणून साहेबांचा शब्द आम्ही पत्थर की लकीर समजतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, मागच्या वेळी तुम्ही सांगितले की, पुढच्या मिटींगमध्ये विषय घेतो. सचिवांनी ते ऐकलेले होते आणि ते ऐकूण त्यांनी हा विषय घेतलेला नाही. ही बाब सचिवांनी लक्षात घेतली पाहिजे.

**नगरसचिव :-**

मी विषय आणला होता. मा. सभापतींना गोषवारा दाखवल्यानंतर त्यांनी सांगितले की, याचा आढावा घेतल्यानंतर पुढच्या मिटींगला विषय घेउ.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. आज ७९ वॉर्डामध्ये प्रत्येक नगरसेवकाच्या वॉर्डामध्ये पाईपलाईन पडलेली आहे. कुठेतरी थोडेसे बाकी असेल. पण आज प्रत्येक माणूस हा नळ कनेक्शन घेतोच. तर मला श्री. बारकुंड साहेबांनी उत्तर द्यायचे आहे की, ७९ वॉर्डमध्ये किती ठिकाणी स्टॅण्ड पोस्ट चालू आहेत. जर त्याच्याकडे आत्ता नसेल तर त्यांनी मला पुढच्या मिटींगला उत्तर दिले तरी चालेल.

**शरद पाटील :-**

पुढच्या मिटींगचा विषय नाही. उत्तर विचारले आहे तर आत्ता द्यावे. माहिती नसेल म्हणजे काय? का माहिती नसेल?

**नयना म्हात्रे :-**

एखाद्या वेळेला प्रत्येक वॉर्डमध्ये किती स्टॅन्डपोस्ट आहेत हे त्यांना बरोबर माहिती नसेल. कारण तेव्हा काढण्याची ऑर्डर दिलेली होते. एखादे कुठे राहिले असेल तर त्यांनी मला तसे उत्तर द्यावे. आता माहिती असेल तर आत्ता द्यावे. नाहीतर पुढच्या मिटींगमध्ये द्यावे. पण मला उत्तर पाहिजे.

**मा. सभापती :-**

मध्ये सर्व स्टॅन्डपोस्ट काढले होते.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सर्व काढलेले नाहीत. बऱ्याचशा वॉर्डमध्ये अजून स्टॅन्डपोस्ट चालू आहेत.

**एस. ए. खान :-**

श्री. बारकुंड साहेब, जरा ही पण माहिती द्या की, आपण यावर्षी किती पाईप खरेदी केलेले आहेत आणि कुठे कुठे पाईप टाकलेले आहेत?

**शिवाजी बारकुंड :-**

पहिला विषय सन्मा. सदस्या सौ. नयना म्हात्रे यांचा आहे. त्यांनी विचारलेले आहे की, स्टॅन्डपोस्ट किती आहेत? वॉर्डवाईस स्टॅन्डपोस्टची माहिती मी पुढच्या मिटींगला सादर करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, तुम्ही अंदाज सांगा की, शहरामध्ये किती आहेत? कारण नेहमी वॉर्ड बदलतात.

**शिवाजी बारकुंड :-**

आत्ता वॉर्डवाईस विचारले तर मी पुढच्या मिटींगला तुम्हाला देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्हाला शहरामध्ये माहिती आहे का?

**एस. ए. खान :-**

हे पण सांगा की, आपण किती पाईपची खरेदी केली? आणि कुठे कुठे पाईप टाकून झालेले आहेत?

**नयना म्हात्रे :-**

एखाद्या माणसाने जर नळाचे बिल भरले नाही तर आपण त्याचे नळ कापून येता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, एकीकडे नागरीकांना पैसे भरुन स्वतःचे कनेक्शन घेउन पाणी मिळत नाही. एकीकडे पाणी फुकट चाललेले आहे. रस्त्यावर चाललेले आहे. लोक त्याचा पाहिजे तसा वापर करतात. त्या स्टॅन्डपोस्ट खाली लोक अंघोळी करतात, कपडे धुतात. रस्त्यावर पाणी सांडून आपले रस्ते खराब होतात. तर अशा ठिकाणी जे स्टॅण्डपोस्ट असतील. जे विनाकारण चालू असतील ते बंद करावे. कारण ज्या ठिकाणी आपण पाईपलाईन दिलेली आहेत. त्याठिकाणी लोकांचा १९९४ चा पुरावा जर असेल तर त्यांनी कनेक्शन घेण्यास काही हरकत नाही.

**तुळशिदास म्हात्रे :-**

तुमच्या माहितीमध्ये कुठे असतील तर ते कळवा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझ्या प्रभागामध्ये जे स्टॅण्डपोस्ट असतील ते बंद करावे असे मी पत्र दिलेले आहे. त्याच्यावर अजूनपर्यंत कार्यवाही झालेली नाही. म्हणून आत्ता सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांनी जो विषय काढला. तर असे जे काही स्टॅण्डपोस्ट असतील ते बंद करण्यात यावे असे माझे मत आहे.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, माझ्या वॉर्डमध्ये एकूणएक स्टॅण्डपोस्ट मी काढले. मग बाकीच्या वॉर्डमध्ये ते कशाला पाहिजे?

**प्रशांत पालांडे :-**

श्री. बारकुंड साहेब, स्टॅण्डपोस्ट काढून टाकायचे असा ठराव झाला होता ना?

**शिवाजी बारकुंड :-**

स्टॅण्डपोस्ट नसावेत. फुकट पाणी द्यायचे नाही, ही संकल्पना आपल्याकडे नाही. आपण हळूहळू कमी करत आणलेली आहे. परंतु, सन्मा. सदस्य श्री. टेरी परेरा साहेब बोलले की, ज्या भागात लाईनच गेलेली नाही. तिथले बंद

करायचे ठरले. तर तिथे लाईनच नाही. हा अडचणीचा मुद्दा आहे. तर तो ही विचारात घेउन पुढच्या मिटींगला मी सविस्तर सांगतो.

**एस. ए. खान :-**

कुठे कुठे पाईपलाईन टाकलेली आहे? ही माहिती सांगा.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. बारकुंड साहेब, अशी काही ठिकाणी आहेत का की, जिथे लाईन गेलेली आहे आणि स्टॅण्डपोस्टसुध्दा सुरु आहेत. मग ती बंद का करत नाही?

**नयना म्हात्रे :-**

हा ठराव स्टॅन्डीगला तीन-चार वर्षापूर्वीच झाला आहे. पण ते आत्तापर्यंत काढले नाहीत.

**प्रशांत पालांडे :-**

कधीपर्यंत बंद होतील?

**शिवाजी बारकुंड :-**

ज्या ठिकाणी लाईन गेलेली आहे आणि स्टॅण्डपोस्ट चालू आहेत. ते बंद करण्याचे कामकाज तातडीने उद्याच चालू करण्यात येईल.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे पाण्याचे कनेक्शन आहेत तिथले स्टॅण्डपोस्ट उद्यापासून बंद केले जातील.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, ज्या ठिकाणी पाण्याची लाईन गेलेली आहे. त्याठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करण्याची काही गरज नाही. त्या नागरीकांनी कनेक्शन घ्यावे. ब-याचशा ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा होतो. अशा ठिकाणी जर टँकरने पाणी पुरवठा होत असेल तर तो बंद करण्यांत यावा. मी तुम्हाला त्याबद्दलसुध्दा पत्रव्यवहार केला पण तुम्ही कार्यवाही करत नाही. आमच्याकडे दोन-तीन ठिकाणी चालू आहे. धोंडूले पाड्याला चालू आहे. जरीमरी गांवदेवी मंदिराकडे चालू आहे. जिकडे पाईपलाईन चालू आहे. टँकरने पाणीपुरवठा करण्याची काही गरज नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्ही पत्र दिलेले आहे का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पत्र दिलेले आहे. पण तुम्ही कार्यवाही केलेली नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

टँकरचे नाही, स्टॅण्डपोस्ट बाबतचे पत्र आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

स्टॅण्डपोस्टचे पण आहे आणि टँकरचा पाणी पुरवठा बंद करण्यात यावा. ज्या ठिकाणी पाईपलाईन आहे. मांडावी पाडा, इथे आपण पाईपलाईन दिलेली आहे. धोंडुर्ले पाडा इथे पाईप लाईन टाकलेली आहे. मी तुम्हाला पत्रव्यवहार केलेला आहे. मांडवी पाड्यासाठी माझा फोने नाही. मी पाईपलाईन टाकलेली आहे. मी तुम्हाला जर तुम्हाला फोन केला असता तर मी सभागृहात कशाला बोलली असती? ते लोक मुद्दाम कनेक्शन घेत नाहीत. कारण त्यांना फुकटचे पाणी मिळते. त्यांनी कनेक्शन घ्यावे. आपण त्यांना चार जणांमध्ये ग्रुप कनेक्शन देतो. त्यांनी ते घ्यावे. एकीकडे आपण नागरीकांना फुकट पाणी देतो आणि एकीकडे लोकांनी पैसे देउन पाणी घ्यावे हे चुकीचे आहे. बंद करुन टाका.

**शिवाजी बारकुंड :-**

मॅडम, त्यांना आपण चार-आठ दिवसाची मुदत द्यायची की, उद्यापासून बंद करायचे? आपण तिथे बोर्ड लिहू या की, आठ दिवसात जर घेतले नाही तर आठ दिवसानंतर इथला पाणीपुरवठा बंद होईल. तुम्ही ग्रुप कनेक्शन घ्या. आपण आठ दिवसाची मुदत देउ या.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, काही लोक स्टॅण्डपोस्टचे पाण्याने सिंटेक्सच्या टाक्या भरतात आणि ते पाणी विकतात. म्हणून ते लवकरात लवकर बंद करा. आपले नगरसेवक असे आहेत की, ते पाण्याच्या टाक्या भरुन ठेवतात आणि ते विकतात.

**शानु गोहिल :-**

श्री. बारकुंड साहब, सन्मा. सौ. ज्योत्स्ना हसनाळे इन्होने जैसे बोला की, ऐसी कुछ जगह पे जहाँ लाईन जाती है। उसके बावजुद लोग कनेक्शन नही लेना नही चाहते और नगरपालिका से टँकर जाता है। तो आपको बंद करने के लिए कहा गया है। लेकिन ऐसा ना हो की, किसी नगरसेवक का फोन जाए। किसी भी पार्टी के नेता का फोन जाए तो आप टँकर भेज दो। किसी भी प्रेशर मे आप आ गए, ऐसा नही होना चाहिए। मोस्टली ऐसा ही होता है। आप इसका खुलासा करो।

**शिवाजी बारकुंड :-**

आत्ता सन्मा. सदस्या सौ. ज्योत्स्ना हसनाळे यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी जे तीन ठिकाणचे पर्टीक्युलर स्पॉट दिलेले आहेत. त्याठिकाणी टँकर जातात. त्यांना असे ठरलेले आहे की, उद्या तिथे आठ दिवसाची

नोटीस जाणार की, आठ दिवसामध्ये ग्रुप कनेक्शन घ्यावेत. अन्यथा येणारा टँकर बंद होईल. आठ दिवसानंतर कोणीही फोन केला तरी त्या ठिकाणी टँकर जाणार नाही. मा. स्थायी समितीने निर्णय घेतलेला. कोणी मला फोन केला तर मी सांगेन की, मा. स्थायी समितीचा निर्णय बदलून घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, पाणीपट्टीची मागची थकबाकी ३ करोडची होती.

**प्रशांत पालांडे :-**

आता हे जे नविन ३५ एम.एल.डी. पाणी येणार आहे. एकूण किती पाणी येणार आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

ते ८६ एम.एल.डी. आणि हे ३० एम.एल.डी. म्हणजे एकूण ११६ एम.एल.डी. पाणी होईल. परंतु, पहिल्यांदा लगेच ३० एम.एल.डी. पाणी येणार नाही. ५ एम.एल.डी., दहा, पंधरा असे वाढत जाईल.

**प्रशांत पालांडे :-**

साधारणपणे, आपली जी लोकसंख्या आहे. तर १२० लीटर मधली पाणी ........

**शिवाजी बारकुंड :-**

नॉर्मस्च्या हिशोबाने हेसुध्दा पाणी आपल्या शहराला कमी आहे. १३५ लीटर्स पर हेड पड डे पर माणसी पाणी पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

८६ अधिक ३५ एम.एल.डी. आले तर ...

**शिवाजी बारकुंड :-**

तेसुध्दा पाणी कमी आहे

**प्रशांत पालांडे :-**

साधारण माणसी किती होईल?

**शरद बेलवटे :-**

११६ होते. साधारण १०० ते ११० च्या दरम्यान जाउ.

**प्रशांत पालांडे :-**

११० लीटर पर हेड. आपल्याला १३५ लीटर पाहिजे. हे जे पाणी आहे ते आत्ताच आपल्याला कमी पडते. अजून पाच वर्षानंतर काय?

**शरद बेलवटे :-**

आपले असे नियोजन आहे. आपण सी.डी.पी. मध्ये जी योजना केंद्र सरकारला सादर केली. मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. चेणा येथे ४० ते ५० एम.एल.डी. चा स्वतःचा सोर्स तयार करायचा आहे. आपण तो प्रोजेक्ट जे.एन.आर.यु.एन. मध्ये घेतलेला आहे. मोरबे डॅममधून १०० एम.एल.डी. चे काम प्रस्तावित आहे आणि जे पोशिर डॅम होणार आहे. अजून झालेला नाही. ते कर्जतजवळ आहे. ते पूर्ण ठाणे जिल्ह्यासाठी आहे. त्याच्यामध्ये आपला २०० एम.एल.डी. चा कोटा राखीव आहे. पण त्याची सुरुवात अजूनपर्यंत झालेली नाही. त्याला केंद्र सरकारकडून मान्यता मिळालेली आहे. ते एम.जी.पी. कडे होते. आत्ता इरिगेशन डिपार्टमेन्ट करणार असे चाललेले आहे. त्याच्यातसुध्दा आपला २०० एम.एल.डी. चा वाटा आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मोरबे डॅम पूर्ण झालेला आहे. त्यांच्याकडे पाणी एक्सेस आहे. मग आपले १०० एम.एल.डी. पाणी कुठे अडले आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

१०० एम.एल.डी. बाबत मा. महासभेचा ठराव झालेला. तो ठराव आपण नवी मुंबई महापालिकेकडे पाठवलेला. नवी मुंबई महानगरपालिकेचे एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, सिटी इंजिनिअर या लेव्हलशी आमची चर्चा झालेली. तद्नंतर आमच्या बैठका होउन कमिशनर लेव्हलच्यासुध्दा बैठका झालेल्या आहेत. त्यात जे टेक्नीकल मुद्दे होते ते सविस्तर चर्चा झालेली आहे. आत्ता त्यांचा धोरणात्मक निर्णय त्यांच्या मा. महासभेने ठराव करुन आपल्याला पाठवला पाहिजे. त्यांचे असे म्हणणे होते की, आमच्या अटी आम्ही तुम्हाला पाठवणार आणि तुम्ही बोलणार की, आम्हाला या अटी मान्य नाहीत. दोघेजण बसून आम्ही आमच्या अटी तयार करतो. त्या तुम्ही बघा. त्यात फेरबदल करुन आपण एकत्रित तयार करुन मग मा. महासभेचा ठराव आम्ही तुम्हाला पाठवू.

**प्रशांत पालांडे :-**

तसे फार काम नाही ना? आपला जो चेण्याचा डॅम होणार त्याच्यानंतर पाणी येणार. त्यापेक्षा मोरबे डॅममधून पाणी आणावे सोपे आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

मोरबे डॅममध्ये आजच्या घडीला साडेचारशे एम.एल.डी. पाण्याचा कोटा आहे. त्यांचे आपल्याला लेखी पत्र आहे. तर तो प्रयत्न केला तर १०० एम.एल.डी. पाणी.........

**प्रशांत पालांडे :-**

आपण मोरबे डॅमबाबत प्रयत्न करतो की नाही?

**शिवाजी बारकुंड :-**

आपण प्रयत्न करतोच आहे. मी हे प्रयत्नच सांगिमले. अधिकारी लेव्हलची चर्चा झाली, आयुक्त लेव्हलची चर्चा झाली. माजी महापौर दोन वेळा आल्या होत्या. त्यांचीही चर्चा झाली. फक्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या मा. महासभेचा निर्णय होणे बाकी आहे. त्यांच्या मा. महासभेने निर्णय घेउन आपल्याला कळवले पाहीजे. दराबाबत आमची चर्चा झालेली आहे. चर्चा अशी झाली की, आम्ही तुम्हाला एम.आय.डी.सी. पेक्षा निश्चित कमी दर देउ. पण स्टेमपेक्षा जास्त दर राहिल. ही सगळी चर्चा झालेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे प्लॅनिंग करताना आपल्याला १५ ते २० वर्षाचे प्लॅनिंग करावे लागेल.

**शिवाजी बारकुंड :-**

आपले २० वर्षाचे प्लॅनिंग आहे. हे ३० एम.एल.डी. म्हणजे जस्ट लाईक स्नॅक्स. आपण जेव्हा न करता स्नॅक्स घेतो तेस हे ३० एम.एल.डी. पाणी येणार आहे.

**प्रशांत पालांडे :-**

१०० एम.एल.डी. मोरबे डॅममधून, प्लस आपला स्वतःचा डॅम प्रस्तावित आहे. आपल्याला तेवढे पाणी २० वर्षे पुरेल?

**शिवाजी बारकुंड :-**

होय. २०४१ पर्यंतचे प्लॅनिंग आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, त्यांनी आता सांगितले की, दर माणसी ११६ लिटर पाणी मिळते.

**शिवाजी बारकुंड :-**

११६ एम.एल.डी. कोटा होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही शहराची पॉप्युलेशन किती पकडता?

**शिवाजी बारकुंड :-**

आठ ते साडे आठ लाख लोकसंख्या आपण पकडतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आत्ता आपल्याला ११६ एम.एल.डी. पाणी मिळते.

**शिवाजी बारकुंड :-**

आजच्या घडीला ८६ एम.एल.डी. पाणी मिळते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक्सेंस आल्यानंतर?

**शिवाजी बारकुंड :-**

११६ एम.एल.डी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आफ्टर टेन इअर्स आपली पॉप्युलेशन तुम्ही काय एक्पेक्ट करता?

**शिवाजी बारकुंड :-**

आपले जे नॉर्मस् आहेत. आपण जो सी.डी.पी. मा. महासभेत मान्य केला. त्याच्यामध्ये सगळे प्रोजेक्शन दाखवलेले आहेत. २०४१ पर्यंतची आपली पॉप्युलेशन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

किती पकडली आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

ते आत्ता माझ्याकडे नाही. आपण २०४१ ची पकडली आहे. ४० ते ५० एम.एल.डी. चेण्याचा डॅम, १०० एम.एल.डी. मोरबे डॅम, २०० एम.एल.डी. पोशिर डॅम. हे एवढे पाणी आहे. ही स्कीम पास झालेली आहे. त्याच्यात त्यांनी हेसुध्दा विचारात घेतलेले आहे की, या शहरात किती पाणी येणार आहे. त्याच्यासाठी सिव्हरेजची पण आवश्यकता आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपला जो ग्रोथ आहे तो २०० टाईम्स आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

२९७ टाईम्स. आशिया खंडात पहिली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग त्या हिशोबाने आपली पॉप्युलेशन पकडली पाहिजे.

**शिवाजी बारकुंड :-**

आपले प्रोजेक्शन तसे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आत्ता तुम्ही मोरबे धरणातील १०० एम.एल.डी. पाण्याबाबत बोलतात की, आम्ही हे प्रयत्न केले. आत्ता नवी मुंबई महानगरपालिकेच्या मा. महासभेमध्ये हा धोरणात्मक निर्णय होणार आहे असे त्या अधिकाऱ्यांना तुम्हाला कधी सांगितले होते.

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्या इलेक्शनच्या तीन-चार महिने पूर्वी श्री. नाहटा साहेब, श्री. गायकवाड साहेब आणि त्या बैठकीला मी ही होतो. तिथे चर्चा झाली. खाली आमच्या लेव्हलच्या अधिकाऱ्यांशी चर्चा झालेली आहे. श्री. नाहटा साहेबांनी सांगितले की, आमच्या इंजिनिअरशी आमची चर्चा झालेली आहे. याच्याबाबत जे धोरणात्मक निर्णय आहे. जशी आपली मा. महासभा आहे. तसा त्यांच्या मा. महासभेत आमच्या लोकांशी चर्चा करुन आम्ही ठेवतो. आणि तुम्हाला कळवतो. तद्नंतर त्यांनी अद्यापही कळवलेले नाही. आपला फॉलो-अप असतो. आपण त्यांना फक्त दुरध्वनीवरुन विचारतो की, साहेब, आमचे पुढे काय झाले? आम्ही एवढे बोलू शकतो. जर सर्वांचे सहकार्य आहे. आपणही प्रयत्न कराल तर चांगले होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी इलेक्शनच्या चार महिने अगोदर सांगितले. आज आपल्या इलेक्शनला चार महिने होउन गेले. जवळ जवळ आठ महिने तुम्हाला तिथून उत्तर आलेले नाही. पण तुम्हाला माहिती आहे की, नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये आपले मा. आमदार श्री. गणेश नाईक साहेब आहेत. त्यांचापण त्या महानगरपालिकेमध्ये होल्ड आहे. मग तुम्ही आम्हाला सांगायला पाहिजे की, त्या महानगरपालिकेच्या मा. महासभेमध्ये तो विषय झालेला नाही. मग आम्ही त्यांच्या मागे लागून ते काम करु शकतो.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्हाला ते ही सांगतो. सन्मा. पालकमंत्री साहेब, यांनीही त्यांच्या स्तरावर त्यांचे अधिकारी व आपले अधिकारी बैठक झालेली आहे. त्यांनीही त्यांच्या अधिकाऱ्यांना पालकमंत्री या नात्याने सुचना दिलेल्या आहेत. म्हणजे त्यांच्यासोबत बैठक झाली नाही किंवा त्यांना माहिती नाही असा विषय नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांना माहिती आहे. त्यांनीच तुम्हाला सांगितले आणि तुम्ही त्या हिशोबाने कार्यवाही केलेली आहे. पण आठ महिने होउन गेले. तिकडच्या मा. महासभेत विषय आलेला नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

पण साहेब, आपण त्यांना फक्त विनंतीच करु शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही आम्हाला सांगा. तिकडच्या मा. महापौरांना आम्ही विनंती करतो की, तुम्ही मा. महासभेमध्ये विषय घ्या.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्हाला याची कल्पना होती. पण आजपासून तुम्ही प्रयत्न करा. तुम्हाला मी झालेल्या पत्रव्यवहाराची कॉपी देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मागच्या स्टॅन्डीगला आपण दर पंधरवाड्याला आणि दर महिन्यामध्ये रिपोर्ट घेत होतो ३० एम.एल.डी. पाण्याच्या संदर्भामध्ये आपण काय-काय करतो आणि ५० एम.एल.डी. आपले जे काही सम्प बाकी आहेत त्याचा आपण फॉलो-अप घेतला होता.

**शिवाजी बारकुंड :-**

हा विषय वेगळा होता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना मी अवगत करु इच्छितो. मोरबे डॅममधून १०० एम.एल.डी. पाणी घेण्याचा निर्णय हा मा. महासभेत झालेला आहे आणि तुम्हाला त्याची कल्पना आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्याची पुढची कार्यवाही काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेला रितसर सादर केलेला आहे. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेचे सन्मा. आयुक्त, आपले मा. आयुक्त आणि संबंधित खात्याचे टेक्नीकल परसन यांची जॉईन्टली बैठक झालेली आहे. आत्ता तो विषय नवी मुंबई महानगरपालिकेच्या मा. महासभेमध्ये येणे अपेक्षित आहे. तर या चर्चेच्या माध्यमातून आम्ही प्रशासनाकडून सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, सर्वांनी पाठपुरावा करणे अपेक्षित आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे. आम्ही तुमच्याकडून तेच एक्सेप्ट करतो की, समजा हा विषय नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये आठ महिने आला नाही. तर तुम्ही आम्हला सांगायला पाहिजे की, नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये हा विषय आलेला नाही. तर तुम्ही कृपया तुमचे जे सदस्य आहेत. जसे कॉंग्रेसचे सदस्य आहेत, राष्ट्रवादीचे सदस्य आहेत, शिवसेनेचे सदस्य आहेत. सगळे सदस्य त्या महानगरपालिकेमध्ये आहेत. आम्ही जॉईन्टली मेहनत करु आणि त्यांना हा विषय घ्यायला सांगू. पण तुम्ही हे सांगायला पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, जो मोरबे डॅम आहे तिकडचे आम्ही विस्थापीत आहोत. मी तिथला लोकल आहे. त्यांच्याकडे पाण्याचा एक्सेस साठा आहे. आणि ते आणणे आपल्याला कम्परेटीव्हली सोपे आहे. ह्या ३५ एम.एल.डी. नंतर ते १०० एम.एल.डी. आणणे आपल्याला सोपे जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही म्हणता की, ३० एम.एल.डी. पाणी टप्प्याटप्प्याने मिरा भाईंदर शहरामध्ये येईल. तर तुमचे काय गणित आहे. ३० एम.एल.डी. पाणी यायला अंदाजे किती महिने लागतील?

**शिवाजी बारकुंड :-**

जर पहिला टप्पा चालू झाला. तर तीने ते चार महिन्यांच्या आत ३० एम.एल.डी. पाणी येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझी अशी विनंती आहे की, आपली स्टॅन्डीगची मिटींग प्रत्येक आठवड्याला होते. तर तुम्ही ३० एम.एल.डी. पाण्याचा आढावा दर महिन्याला द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

दर महिन्याला देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही स्कीम कुठंपर्यंत आली? जर तुम्हाला कुठे अडचण असेल तर तुम्ही आम्हांला सांगा. आम्ही त्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करतो.

**प्रशांत पालांडे :-**

सदर विषयाच्या संदर्भात मी सांगतो की, आपण काही लोक नवी मुंबई महानगरपालिकेच्या मा. महापौरांना भेटू या की आमचा तो ठराव लवकरात लवकर आणा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुमच्या मार्गदर्शनाखाली आपण नवी मुंबई महानगरपालिकेला एकदा व्हिझीट घेउ या.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, तुम्ही एक दिवस ठरवा. कधी जायचे ती तारीख आत्ताच ठरवा. आपण सगळे जॉईन्टली तिथे जाउ.

**शानु गोहिल :-**

आपने जो बोला की, तीन महिने मे टप्पे टप्पे मे आएगा। तो पहले टप्पे मे कितना आएगा?

**शिवाजी बारकुंड :-**

पाच से सात एम.एल.डी. पहिले चालू होगा।

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, त्या १०० एम.एल.डी. साठी तुम्ही पुढाकार घ्या.

**एस. ए. खान :-**

याच्यामध्ये आत्ता किती वसुली बाकी आहे?

**मा. सभापती :-**

पन्नास टक्के बाकी आहे.

**एस. ए. खान :-**

एवढी वसुली का बाकी आहे? बिल्डरकडून किती थकबाकी बाकी आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

पाणी बिलाची थकबाकी बिल्डरकडे नाही. सोसायटयांकडेच आहे. आणि जनरली पाण्याची बिले भरण्याकडे लोकांचा सहभाग बरा आहे. जानेवारीपासून सगळ्या वॉर्डमध्ये चांगली मोहिम राबवणार. आणि जानेवारीपासून वेळपण आहे. जर कोणी दहा किंवा पंधरा दिवसाचा वेळ मागितला तर आपण देतो. पण तद्नंतर भरले नाही तर आपण त्यांचे कनेक्शन कट करणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. श्री. शिवाजी बारकुंड साहेब आपली मागची थकबाकी दोन करोड अठ्ठयान्नव लाख आहे. त्याच्यात आपण एक करोड एकावन्न लाख फक्त वसूली केली. म्हणजे आपली पन्नास टक्के म्हणजे एक करोड एकावन्न लाख रुपये वसूली बाकी आहे. मग आपली ही एक करोड एकावन्न लाख रुपये कोणाची बाकी आहे? म्हणजे मेजर अमाउंट कोणाची बाकी आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

सोसायटी किंवा कोणाची मेजर अमाउंट बाकी नाही. मिऱ्याला ज्या तीन चार कंपन्या आहेत. ज्या बंद आहेत. त्या अजून डेव्हलप झालेल्या नाहीत. म्हणजे तसे आपण प्लॅनिंगला पत्र दिलेले आहे. पाणी बंद आहे. कनेक्शन बंद आहेत. आपण तिथे नगररचनाला पत्र देउन ठेवले आहे की ही जर कंपनी रिडेव्हलपमेंटसाठी आली तर पाणी बिलाची रक्कम घ्या. दुसरे आपले जे टेंभा हॉस्पिटल आहे त्याची दिड ते दोन लाख रुपये बाकी होती. त्याच्यात आपण मायनस करावे म्हणून कळवलेले आहेत. पण ते पहिल्यापासून भरतच नव्हते. बाकी सोसायटीचे आहेत. मेजर बिल्डर किंवा अशी कोणाचीही थकबाकी नाही.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. शिवाजी बारकुंड साहेब, टॅक्स डिपार्टमेंट आणि पाणी पुरवठा विभाग हे वसूलीसाठी कनेक्टेड आहेत. म्हणजे तुमचा आपआपसामध्ये सुसंवाद असतो का? मागच्या वेळेस आमचा टॅक्सवर विषय झालेला एखाद्या बिल्डरने कर भरला नसेल तरी त्याला पाण्याचे कनेक्शन देण्यांत आले होते. त्यावेळी आपली चर्चा पण झाली होती.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. श्री. अजित पाटील साहेबांनी, मिटींग झाल्यानंतर मा. आयुक्त साहेबांनी आदेश आम्हांला काढलेले आहेत की शंभर टक्के कर भरणा झाल्याशिवाय नळाचे कनेक्शन मंजूर करु नये. आणि त्यानुसार ज्या दिवसापासून आदेश प्राप्त झाला आहे त्या दिवसापासून आम्ही अंमलबजावणी चालू केलेली आहे कारण याच्यात आत्ता वाद होणारच आहेत. सन्मा. सदस्य माझ्याकडे येतात की, तुम्ही शंभर टक्के कसे देता? मला आदेश आलेला आहे की शंभर टक्के झाल्याशिवाय...

**प्रशांत पालांडे :-**

साहेब तो विषय नाही. समजा एखादा मोठा बिल्डर असेल. गेल्या सभेत ती चर्चा झालेली की त्यांनी टॅक्स भरला नसेल आणि त्याला कनेक्शन दिले गेलेले आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

पूर्वी असेसमेंट लागला की, आपण त्याला कनेक्शन देत होतो. त्याच्यानंतर आत्ता मा. स्थायी समितीमध्ये चर्चा झाली आणि मा. आयुक्तांनी आदेश काढला की भरल्याशिवाय देउ नये. तर त्याची अंमलबजावणी आपण चालू केली आहे. आपण त्याप्रमाणे करतो.

**प्रशांत पालांडे :-**

तुम्ही टॅक्स शंभर टक्के केला की, ऐंशी टक्के?

**शिवाजी बारकुंड :-**

मला जे पत्र आले आहे ते शंभर टक्के चे पत्र आलेले आहे.

**एस. ए. खान :-**

शंभर टक्के कोणी ठरवले?

**प्रशांत पालांडे :-**

साहेब परत वाद होणार.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ऐंशी टक्के ठरवले होते.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, काही लोक रहात नाहीत. त्यांच्याबद्दल वाद चाललेला. पाच जण जरी नसतील तरी ते ऐंशी टक्के होत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. स्थायी समिती आणि सर्वांच्या चर्चेनुसार असे ठरते की तुम्हीच उपस्थित केले की, काही लोक रहात नाहीत. तर परिस्थिती पाहून...

**एस. ए. खान :-**

ज्याला टॅक्स लावला त्याच्याकडून पूर्ण घ्या. म्हणजे नवीन लाईनसाठी जो अर्ज करतो. त्याचे असेसमेंट झाले की, त्याला सांगा. पूर्ण चेक द्या आणि पूर्ण करा. म्हणजे तो रहायला आला की, त्याच्याकडून मेंटेनन्स घेतो. त्या मेंटेनन्समध्ये तो टॅक्सपण लावतो म्हणजे त्यांना सांगतो की, तुमचा टॅक्स मी भरणार.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. श्री. बारकुंड साहेब आपण चार दिवस पाण्याचा गॅप देतो. प्रत्येक वॉर्डमध्ये आठवडयाचा एक एक दिवस पकडला तर महिन्यातून चार दिवस होतात. पण आपल्या बिलामध्ये काहीच फरक पडलेला नाही. बिल येते तेवढेच येते.

**शिवाजी बारकुंड :-**

बिलाचे सांगतो. आपल्याकडे शंभर टक्के मीटर सिस्टम आहे. मीटर रिडींगवरूनच आपण बिल बनवतो. जेवढे पाणी वापरले असेल त्याचे रिडींग होते. मिटरबाबत कोणाची शंका असेल, माझ्याकडे काही तक्रारी येतात तर आम्ही काय करतो संबंधित नागरिक, आमचा कर्मचारी जाउन मिटरचे आकडे चेक करा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ही माहिती चुकीची आहे. आपले जे लिपीक आहे ते जेव्हा तिकडे मिटीर रिडींग घ्यायला जातात ते मिटर रिडींग घेत नाहीत. ते बसूनच सरासरी बिल पाठवतात. माझ्या प्रभागात ज्या सोसायटी आहेत. त्यांनी याच्याबद्दल तक्रारी केलेल्या आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

तुमच्या भागात तुमच्या वॉर्ड ऑफीसरला माझे सिनिअर क्लार्क आणि मी स्वतः भेट दिलेली सगळे रेकॉर्ड बघितलेले आहे. त्यांना त्या सुचना द्यायच्या होत्या त्या सुचनापण दिलेल्या आहेत. मागच्या महिन्यात मी स्वतः अचानक आलो होतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पण सरासरी बिल पाठवतात एवढे नक्की का? मिटर रिडींगप्रमाणे बिल पाठवत नाहीत. सरासरी बिल पाठवतात. मिटर रिडींगप्रमाणे घ्यायला गेला. आणि जर महिन्यातून चार दिवस कपात होते. तर बिलामध्ये फरक पडला असता की नाही?

**शिवाजी बारकुंड :-**

काही ठिकाणी वस्तुस्थिती आहे. त्यांना समजपण देण्यात आलेली आहे. आणि ज्या ठिकाणी तक्रारी असतात तिथे आम्ही सांगितले आहे की, तुम्ही मिटर रिडींग घेताना शक्यतो दाखवा की, तुमचे मिटर रिडींग हे आहे. कारण परत तक्रार होण्यापेक्षा ते त्याचवेळी दाखवले तर चांगले सोयीस्कर होईल.

**प्रशांत पालांडे :-**

पण बिले मिटर रिडींग करुन पाठवता की तुमचे कॅल्क्युलेशन आहे की १४ इंच व्यासाच्या पाईपमधून...

**शिवाजी बारकुंड :-**

नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब बऱ्याच वेळा मीटर बंद पडले्ले असतात तरी तुम्ही...

**शिवाजी बारकुंड :-**

मिटर चालू ठेवण्याची जबाबदारी संबंधित सोसायटीची आहे. त्यांनी जर चालू ठेवले नाही तर आपण सरासरी बिल पाठवतो. आणि ते बिल मिटर रिडींगपेक्षा थोडे जास्त असते. कारण त्यांनी तो मिटर चालू करावा हा त्याच्या मागचा उद्देश असतो.

**प्रशांत पालांडे :-**

तुम्ही सोसायटीला कळवता की तुमचे मिटर बंद आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब सांगितलेले असते.

**प्रशांत पालांडे :-**

तुम्ही नोटीस देता की, मिटर बंद आहे.

**मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने माहिती देउ इच्छितो की महाराष्ट्रामध्ये फ्लॅट रेट बिलींग आहे. तुम्ही बोललात की पाउण इंच दोन इंच. नळाच्या साईजवर वार्षिक दर आहेत. नगरपालिकांना आणि महानगरपालिकांना आठशे दहा रुपये मिनिमम दर आहे.

**प्रशांत पालांडे :-**

तिकडे दररोज पाणी येत असणार?

**मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

साहेब हेच तुम्हांला सांगायचे आहे. महिन्यातून चार दिवस, काही शहरामध्ये पंधरा दिवस काही शहरामध्ये हफ्त्यातून एक दिवस अशी परिस्थिती आहे. महाराष्ट्रामध्ये काही काही शहरांमध्ये पाण्याची खूप अडचण आहे. त्यांनी तिथे ते कॅल्क्यूलेशन करुन दर कमी केले जात नाहीत. वार्षिक दरच घेतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपल्याला वर्षाला जे भरायचे आहे तेवढेच घेणार.

**मा. सभापती :-**

पाण्याचा विषय लवकर संपणार नाही. बरीच चर्चा करायची असते. मला श्री. बारकुंड साहेबांना एवढेच विचारायचे आहे की, पन्नास टक्के वसूली झाली त्याचे काय? जानेवारीपर्यंत हे किती वसूली करणार ते महत्त्वाचे आहे. तर कामे करु शकतो. आपण कामे काढू शकतो.

**शिवाजी बारकुंड :-**

जवळ जवळ नव्वद टक्के वसूली पाणी पुरवठा विभागाची होते. आपण मार्चपर्यंत तेवढी वसूली करु.

**मा. सभापती :-**

आत्ता सर्व पाण्यासाठी बोंबाबोंब करत होते. आपले पाण्याचे पैसे भरायचे आहेत. आत्ता ३५ एम.एल.डी. पास झाले आहे. त्यासाठी मी ते रिव्हयू करत होतो. पैसे आले तर आपल्याला एफ.डी. तोडायची गरज नाही. मी ताबडतोब जानेवारी महिन्याच्या पहिल्या हफ्त्यामध्ये भरायला लावणार ही माझी मनापासून भावना होती.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. बारकुंड साहेब नव्वद टक्के सांगतात पण आपली थकबाकी किती होती? ती आणि चालू मिळून नव्वद टक्के होईल? मग गेल्या वेळेस एवढी का राहिली?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

याची चालू वार्षिक मागणी २३.४७ आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मी थकबाकीचे बोलतो. गेल्यावेळी थकबाकी दाखवते पन्नास टक्के आहृे

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

पन्नास टक्के नाही.

**प्रशांत पालांडे :-**

ती कशी काय?

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

२३.४७ या वर्षी वसूली झाली.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे थकबाकी अधिक चालू याच्यामध्ये नव्वद टक्के वसूली होईल. बजेटमध्ये आपले तीस कोटी दाखवते आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

बजेटमध्ये एकूण तीस कोटी पस्तीस लाख रक्कम दाखवलेली आहे. जूनपासून ३० एम.एल.डी. पाणी येणार आहे. असे गृहित धरुन बजेटमध्ये ती रक्कम दाखवलेली आहे. म्हणून मी ती पुढे दिलेली आहे. तुम्ही पाहा अर्थ संकल्पीय तरतुद आणि ॲक्च्यूअल मागणी वसूली ही २६ कोटी ४६ लाख आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आता आपली पन्नास टक्के आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

तेरा कोटी चौतीस लाख वसूल झालेली आहे. मार्चपर्यंत ती वसूली होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण यांना टारगेट देउ या की आपण एफ.डी. तोडणार होतो. ती एफ.डी. न तोडता यांच्याच पाणी पट्टी वसूलीतून करावे.

**मा. सभापती :-**

मी तेच बोलतो. पण तुम्ही कोणीही बोलत नाहीत. आपण हा विषय त्यासाठीच घेतला की, हे पैसे येतील ते भरता येतील. म्हणून मी रिव्हयू करायचे ठरवले आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण बिले गेल्यानंतर नोटीस देतो. आत्ता मा. स्थायी समितीमध्ये आजच निर्णय झाला तर बरे होईल. आपण बिल दिल्यानंतर पंधरा दिवसांनी भरले नाही तर त्याला ४८ तासाची नोटीस देतो. आत्ता निर्णय झाला की, नोटीस द्या. नोटीस दिल्यानंतर ४८ तासात झाले नाही तर ते कनेक्शन डिस्कनेट करण्याची...

**एस. ए. खान :-**

अमांउंट बघा.

**मा. सभापती :-**

एवढे दिवस वसूली का झाली नाही?

**शिवाजी बारकुंड :-**

जनरली जानेवारी ते मार्च महिन्यामध्ये कुठलीही वसूली मॅक्झीमम होते.

**शानू गोहिल :-**

श्री. बारकुंड साहब, यह तो वसूली की बात हो गयी। वैसे मिरा भाईंदर मे ऐसी कई बिल्डिंग है जिसमे इलिगल कनेक्शन को रेग्यूलाईज नही किया गया। उसके बारे मे आपने छानबिन कि है के नही? कनेक्शन वो लोग यूज कर रहे है। उसको रेग्यूलाईज किया नही। उसको पॅनल्टी लगा कर करना चाहिए।

**प्रशांत पालांडे :-**

बारकुंड साहेब, मिरा रोडला काही ठिकाणी व्यवस्थित पाणी येते. परंतु, काही ठिकाणी जसे पुनम सागर वगैरे एरिया आहे. जास्त आपण टेल इन आहे तिथे पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे. तो आपण कसा सॉल्व्ह करणार?

**शिवाजी बारकुंड :-**

पुनम सागरचा आपण सर्व्हे केलेला आहे. त्यासाठी टेक्नीकल आम्ही तयार केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

५० एम.एल.डी. पाण्याच्या स्कीम साठी किती सम्प बाकी आहे. त्याचे स्टेटस काय आहे? ते कधी होणार?

**शिवाजी बारकुंड :-**

५०एम.एल.डी बाबत आपला हा जो आढावा चालु आहे. आपण त्यांना दर पंधरा दिवसांनी किंवा महिन्याला बोलवतो तुम्ही आज सांगा, त्या एम.जी.पी च्या अधिकाऱ्यांना आपण पंधरा दिवसांनी बैठकीला बोलावुन ५० एम.एल.डी मधील काही कामे अर्धवट राहिलेली आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या कामाचा काय स्टेटस आहे ते तुम्ही रिपोर्टींग करा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, ज्या ठिकाणी पाण्याच्या टाक्यांची क्षमता कमी आहे तिथे टाक्या बांधण्याचा विषय तुम्ही पुढच्या मिटींगला घ्या. कारण आमच्या काशीगांव इथे जी पाण्याची टाकी आहे त्याची क्षमता फार कमी आहे. मी असे सांगत नाही की, एकाच ठिकाणी करा. मिरा भाईंदर परिसरामध्ये जिथे जिथे टाक्यांची क्षमता कमी आहे त्या ठिकाणी पुढच्या बजेटमध्ये घेताना टाक्या वाढवुन घ्या.

**मा. सभापती :-**

पाणी पुरवठा विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३, सन २००७ – २००८ या वर्षाकरिता मुर्धा ते उत्तन विभाग बाजार वसुलीच्या निविदेस मंजुरी देणेबाबत.

**शानु गोहिल :-**

किसी भी एरिया मे आप के विभाग से काम चलता है तो वहॉ के स्थानिक नगरसेवको को इन्फॉर्म करने का काम आपका है? क्योंकी लोग हम लोगो को पुछ ते है की, यह पाईप लाईन क्यो डाल रहे है? हम लोगो को कन्फ्युजन होता है। हम लोगो को कोई जानकारी नही होती। यह आपका काम है की, कम से कम वहॉ के स्थानिक नगरसेवको को इन्फॉर्म किया जाए की, यह पाईप लाईन क्यो डाल रहे है।

**मा. सभापती :-**

सन्मा. बारकुंड साहेबांनी सर्वांना कळवावे की, तुमच्या वॉर्डमध्ये काम चालु आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३ चे वाचन केलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. श्री. पाटील साहेब, आम्ही नवीन सदस्य आहोत तर टेंडर कसे काढतात मुदत कुठली देतात, ही माहिती आम्हाला द्या म्हणजे, साधारण ०१ एप्रिल ते ३१ मार्च असा पिरिएड आसायला पाहिजे.

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

अकाउंट प्रामणे असायला पाहिजे. काही वेळेला टेंडर रिकॉल होतात. त्यावेळेला त्यांना मुदतवाढ दिली जाते. ३१ मार्च पर्यंतची मुदत असली आणि आपण टेंडर दिले नाही. तर आपण टेंडर एप्रिल किंवा मे महिन्यात काढतो.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांना मुदत वाढवुन देतो?

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

आपण बारा महिने फिक्स केलेले आहेत. म्हणते टेंडर काढल्यापासुन बारा महिने मागच्या वर्षाची आपली जी रक्कम असते त्याच्यावर दहा टक्के ॲड करुन आपण फिक्स करतो आणि नविन टेंडर मागवत असतो.

**प्रशांत पालांडे :-**

आता समजा, ३० जुनला मुदत संपली आपला मध्ये इलेक्शनचा पिरिएड होता. आपण त्यांना मुदत वाढवुन देतो. मग त्या मुदत वाढवुन दिलेल्या पिरिएडबद्दल आपले धोरण काय?

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

त्याचा जो मागचा रेट असतो त्या रेटप्रमाणे त्याने पैसे भरायचे.

**प्रशांत पालांडे :-**

ते पैसे कसे घेतो? ते मंन्थली कोणत्या बेसिवर येते.

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

दर महिन्याला येते.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांच्याकडुन आपण काही डिपॉझिट वगैरे घेतो का? किती टक्के डिपॉझिट घेतो?

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

पंधरा टक्के डिपॉझिट असते.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे त्या अमाउन्टच्या पंधरा टक्के डिपॉझिट घेतो?

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

वर्षाच्या टेंडर जी अमाउंट असेल त्याच्या पंधरा टक्के डिपॉझिट असते. वर्षाचे टेंडर असते त्याचे पंधरा टक्के डिपॉझिट असते त्याप्रमाणे तो तीन हफ्ते भरतो.

**प्रशांत पालांडे :-**

दर महिन्याला?

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

तीन महिन्याला हफ्ते भरतो मुदतवाढ दिल्यानंतर मागच्या बारा महिन्यांची जी अमाउंड आहे त्या हिशोबाने भरतो.

**प्रशांत पालांडे :-**

हॉकर्स झोन आणि नो हॉकर्स झोन याच्या बद्दल आपले काय धोरण असते?

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

आपल्या ज्या अटीशर्ती असतात की, कोणत्या हॉकर्स झोनमध्ये घ्यावे.

**प्रशांत पालांडे :-**

आपले हॉकर्स झोन डिक्लेअर झाले आहेत का? त्याची माहिती द्या.

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

आपल्या बाजाराच्या अटीशर्तीमध्ये सगळे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. श्री. अजित पाटील साहेब, आपण जे उत्तनला टेंडर कॉल केले त्याच्या टेंडर फॉर्मचे किती रुपये घेतले?

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

शंभर रुपये.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भाईंदर ईस्ट आणि भाईंदर वेस्टचे किती?

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

एक हजार रुपये.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आणि याची अनामत रक्कम किती.

**अजित पाटील ( कर निर्धारक तथा संकलक ) :-**

पंधरा टक्के

**ध्रुवकिशोर पाटील :-**

निविदा फॉमचे फक्त हजार रुपये आहेत. हे तुम्ही हजार रुपये कशामुळे ठेवली आहे? म्हणजे कॅल्क्युलेशन कसे केले?

**मा. उपायुक्त (मु.) सो :-**

टेंडरची जी निवीदा असते साधारणतः किती टेंडर  तयार करणे अपेक्षित आहे. ही टेंडर डॉक्युमेंटचा किंमत ठरवली जाते. साधारण प्रशासनाचा खर्च त्यातुन वसुल व्हावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, बांधकाम विभागामध्ये जे मोठे टेंडर असते तर त्याची फी पाच हजार, साडेसात हजार, दहा हजार अशी असते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बांधकामाचे डॉक्युमेन्ट शंभर ते दिडशे पानांचे असते. त्याचे जे डॉक्युमेन्ट असते, त्यांच्या ॲग्रीमेन्टचा जो फॉरमॅट असतो त्याची कॅपेसिटी जास्त पेजची असते आणि हे तेवढे नसते.

**शरद पाटील :-**

साहेब, आपल्या लोकांकडे चर्चा असते की, आपण टेंडरचे फॉर्म सगळ्यांना देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, एक सांगा प्रकरण क्र. १४ मध्ये शेवटी तुम्ही लिहलेले आहे की, दि. २३/१०/२००७ अनुसार बाजार वसुली आदेश देण्यात आले आहेत. म्हणजे हा विषय अवलोकनार्थ आहे का?

**अजित पाटील :-**

टेंडर काढले होते तेव्हा आचारसंहिता होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला फक्त एवढेच पाहिजे की, अवलोकनार्थ आहे. पण तुम्ही तसे द्या.

**अजित पाटील :-**

पण मान्यता घ्यावीच लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अवलोकनार्थ मान्यता घेतात तशी तुम्ही घ्या.

**अजित पाटील :-**

आचारसंहितेमुळे त्याला ऑलरेडी ऑर्डर दिलेली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अवलोकनार्थ असा शब्द त्याच्यामध्ये वापरा. तुम्ही २३/१० ला आदेश काढलेला आहे.

**अजित पाटील :-**

त्यावेळेला इलेक्शन पिरिएड होता. इलेक्शन पिरिएडमध्ये ऑर्डर काढलेली आहे. स्थायी समिती अस्तित्वात नव्हती आणि टेंडर काढण्याची आवश्यकता होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या विषयात तुम्ही मान्यता दिलेली आहे. वसुली करायला सुरुवात झालेली आहे. फक्त आमच्या माहितीसाठी तुम्ही दिलेले आहे ना?

**मा. सभापती :-**

या विषयाचे अवलोकन करण्यासाठी मा. आयुक्तांनी हा विषय पाठवलेला आहे. त्याचे आपण अवलोकन केलेले आहे.

**प्रकरण क्र. १३ :-**

सन २००७-२००८ या वर्षाकरिता मुर्धा ते उत्तन विभाग बाजार वसुलीच्या निविदेस मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील **मुर्धा ते उत्तन चौक** या विभागासाठी सन २००६-२००७ या वर्षातील बाजार लिलावाची मुदत दि.३०/०६/२००७ रोजी पुर्ण होत आहे. सदर मुर्धा ते उत्तन चौक या बाजार लिलावापासून महानगरपालिकेस निश्चित उत्पन्न मिळत असून मुर्धा ते उत्तन चौक या विभागाकरीता सन २००७-२००८ या वर्षाकरीता बाजार लिलावाची रक्कम रु.३,०८,०००/- इतकी निश्चित करुन दि.०८/०६/२००७ रोजीच्या "दै. मुंबई लक्षदीप" व साप्ताहीक "सूरजप्रकाश" या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करुन दि. १६/०६/२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता विहीत मुदतीत तीन निविदा पत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदा धारकांचे नांव | देकारातील अपेक्षित रक्कम | निविदेत प्राप्त झालेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती लिलाबाई कलबाटे | ३,०८,०००/- | <u>३,०९,९००/-</u> | श्रीमती लिलाबाई कलबाटे यांची निविदा देकारापेक्षा रु.१,९००/- रुपयांनी जास्त रक्कमेची प्राप्त झालेली आहे. |
| २ | श्री. अजय पवार | ३,०८,०००/- | २,५१,०००/- | |
| ३ | श्री. समीर परेरा | ३,०८,०००/- | ३,०१,१११/- | |

मुर्धा ते उत्तन चौक या विभागाचा सन २००७-२००८ (दि.०१/०७/२००७ ते ३०/०६/२००८) या कालावधी करीता बाजार वसुली बाबत निविदा मागविण्यांत आले असता सदर प्राप्त निविदामध्ये श्रीमती लिलाबाई कलबाटे यांची दि.३,०९,९००/- एवढया रक्कमेची निविदा प्राप्त झालेली होती. सदरची निविदा महानगरपालिकेने अपेक्षित केलेल्या देकारापेक्षा रु.१,९००/- रुपयांनी जास्त आलेली आहे.

मुर्धा ते उत्तन चौक या विभागाच्या बाजाराची मुदत दि.३०/०६/२००७ रोजी पुर्ण होणार होती. परंतु दरम्यानच्या कालावधीत महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२००७ बाबतची आचार संहिता दि.२८/०६/२००७ पासून लागू झाली होती. निवडणूक प्रक्रिया होऊन ही मा. स्थायी समिती गठीत झाली नव्हती. महानगरपालिकेने अपेक्षित केलेल्या देकार रक्कमेपेक्षा जास्त देकार रु.३,०९,९००/- ची निविदा आल्याने जा.क्र.मनपा/कर/१३७२/२००७-२००८, दि.२३/१०/२००७ नुसार बाजार वसुली आदेश देण्यांत आले आहेत. त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १५, सन २००७-२००८ या वर्षातील भाईंदर (प.) व भाईंदर (पू.) विभाग बाजार फी वसुली निविदेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यामध्ये तुम्ही तीनदा निविदा काढले असे म्हटलेले आहे. तरीसुध्दा लोवेस्ट आलेले आहे. त्यानंतरची प्रोसीजर काय? यापूर्वी अशा पध्दतीने काही घडले असेल त्यावेळी प्रशासनाने काय निर्णय घेतला?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

याच्यामध्ये शंका अशी वाटते की, किती टेंडर फॉर्म किती विकले गेले?

**अजित पाटील :-**

पहिल्या वेळेला पंधरा - सोळा गेले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पंधरा - सोळा टेंडर फॉर्म गेल्यानंतर तीनच लोकांनी किंवा चारच लोकांनी टेंडर डॉक्युमेन्ट का भरले? इतर लोकांनी का भरले नाही? म्हणून आम्ही तुम्हाला सांगतो की, आपल्या महानगरपालिकेची जी बोंबाबोंब होते. ती थांबविण्यासाठी आपण टेंडर फॉर्मचे रेट वाढवले. दर वेळेला पंधरा टेंडर फॉर्म गेले आहेत. म्हणजे याच्यामध्ये काहीतरी आहे असे तुम्हाला वाटत नाही का? तुम्ही त्यांना विचारा की, तुम्ही टेंडर फॉर्म घेउन गेले तर टेंडर का टाकले नाही?

**अजित पाटील :-**

आम्ही कसे विचारणार. फॉर्म गेल्यानंतर त्याची चॉईस आहे की, टेंडर भरायचे आहे किंवा नाही.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, याच्यामध्ये कमी आलेले दर आहेत. तर प्रशासनाने याच्यात काही सक्ती केलेली आहे का? जिथे ना फेरिवाला झोन आहे. तिथे बसायला द्यायचे नाही. तिथे वसुली करायची नाही.

**अजित पाटील :-**

आपल्या अटीशर्ती क्लिअर आहेत. त्यामध्ये नगरपालिकेने ना फेरिवाला क्षेत्र दिलेले आहे.

**एस. ए. खान :-**

मागेपण आपण केले होते. तेव्हा जास्त भरत होते आणि टेंडरचे रेट जास्त आहेत. आत्ता कमी आले म्हणजे त्यांना वाटले नाही पाहिजे की, प्रशासन सक्ती करणार आहे. बसायला देणार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा श्री. अजित पाटील साहेब, ना फेरिवाला क्षेत्रातून वसुली केली जाते. त्याच्यावर आपला काय कंट्रोल आहे?

**शरद पाटील :-**

श्री. पाटील साहेब, आजपर्यंत आपण त्यांना ना फेरिवाला क्षेत्रात वसुली करायची नाही म्हणून सांगतो तरीसुध्दा वसुली झाली. त्याच्यावर तुम्ही काय कार्यवाही केली? ठेकेदाराकडून ते पैसे आपण वसुल केले का? मग आत्ता तुम्ही ना फेरिवाला क्षेत्रामध्ये देणार नाही आणि परत वसुली करणार.

**सुनिता पाटील :-**

त्यांना बसायला का देता?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपला ऑक्ट्रॉयमध्ये नियम आहे की, हद्द सोडली आणि त्याला पकडले तर १० टक्के पॅनल्टी लागते. आणि महानगरपालिकेत जमा होते. मग याच्यात का नाही?

**एस. ए. खान :-**

तुम्ही अशी सक्ती केली तर रेट कमी होईल.

**शरद पाटील :-**

आपण ॲग्रीमेन्टमध्ये कंडीशन टाकतो. पण त्या कंडीशनचे पालन कुठे होते?

**एस. ए. खान :-**

तुम्ही थोडी सवलत देणार तर जास्त रेट भरणार. कमी केला म्हणून आपण सक्ती करायची की, बसायला देणारच नाही आणि वसुली केली तर त्याला पॅनल्टी लागणार आणि बसायला देणार नाही म्हटले तर ती आपल्या प्रशासनाची जबाबदारी आहे.

**शरद पाटील :-**

आजपर्यंत त्या ठेकेदाराकडून कुठे तरी पॅनल्टी घेतली का? याच्यावर किती तक्रारी झालेल्या आहेत. या मिटींगमध्ये चर्चा झालेली आहे की, तो ठेकेदार ना फेरिवाला क्षेत्रामध्ये वसुली करतो. त्याच्यावर काय कार्यवाही केली? काही कार्यवाही केली जात नाही आणि ठेकेदाराला कुठलेही पनिशमेन्ट होत नाही.

**एस. ए. खान :-**

पण सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब, तुम्ही जास्त पैसे घेतले तर वसुल कुठून करणार? तिथूनच वसुल करणार ना. शहराच्या हितासाठी थोडे कमी केले तर होईल.

**नयना म्हात्रे :-**

जास्त पैसे म्हणजे किती? आपले आहेत तेवढेच आपल्याला मिळत नाहीत.

**एस. ए. खान :-**

पण थोडेफार वाढवून द्या. तुम्ही जास्त दिले एक करोड रुपये मागेसुध्दा ९२ होते. मग तसेच होणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उनकी बात अलग है। वो कहते है की, ना फेरिवाला क्षेत्र मे वसुल करते है।

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य एस. ए. खान साहब, यह सब ना फेरिवाला क्षेत्र मे ना बैठने के बाद ही वो टेंडर था। उसके बावजुद उन्होने वसुल किया। अटीशर्ती है तो उसके हिसाब से उनके उपर कानुनी कार्यवाही होनी चाहिए।

**मा. सभापती :-**

प्रशासन का काम है उधर बाजार बैठना नही चाहिए। वहॉ से बाजार उठाना चाहिए।

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, प्रशासनाच्यावतीने उठवायला जातात. दोन दिवस उठवतात. चार दिवस बंद होते. सुट्टी असेल तर बंद. रविवारी पण उचलायचे चालू ठेवा. त्या दिवशी बंद का ठेवतात?

**नयना म्हात्रे :-**

उचलणारे आपले ठेका पध्दतीनेच मुले आहेत. त्यांना सुट्टी नसतेच हे अधिकारीच सुट्ट्या मारतात.

**तुळशिदास म्हात्रे :-**

मागे आपण मा. स्थायी समितीमध्ये असे ठरवलेले की, जे खरोखरच पंधरा वर्षापासून राहत असतील. ज्यांच्याकडे रेशनकार्ड आहे. त्यानांच द्या. असा ठरावसुध्दा आम्ही केला होता. मिरा भाईंदरमध्ये बाहेरचे फेरिवाले वाढू नये म्हणून जे पंधरा वर्षापासून राहात असतील त्यांनाच द्या.

**शरद पाटील :-**

साहेब, हाच विषय आहे. वसई-विरार येथे फेरिवाल्यांना बंद केले. वसई - विरारचे सगळे फेरिवाले मिरा भाईंदरमध्ये आले. जे जुने आहेत त्यांना आपण उठवत नाही ते सोडून द्या. पण जे नवीन येतात त्यांनासुध्दा आपण रोखू शकत नाही. ही सत्य परिस्थिती आहे. सगळ्यांचा ठेका मिरा भाईंदरने घेतलेला आहे. कारण आपले प्रशासकीय लोक त्याच्यावर लक्ष देत नाही. असे माझे स्पष्ट म्हणणे आहे. त्या युनियन बनवायला आपण प्रशासकीय लोक मौका देतो आणि दहा दिवस बसल्यानंतर दहा वर्षे बसल्याचा दावा ते लोक करतात. आम्ही कोणत्या फेरिवाल्यांच्या विरोधात नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, वसई - विरारमध्ये कसे थांबवले त्याची माहिती घ्या. त्यांनी काय कार्यवाही केली याची माहिती घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. उपायुक्त श्री. ओमप्रकाश दिवटे साहेब यांच्याशी मी चर्चा केली की, मुंबईच्या लगत जे डेव्हलपमेन्ट होतात आणि लोकांचे मायग्रेशन होते आणि बिझनेस प्रोसेस असल्यामुळे इथे खुप मोठ्या प्रमाणात लोक येतात आणि संधी मिळाली तर व्यवसाय करतात. आपल्या शहरामध्ये हा जो बेकायदेशीर फेरिवाल्यांचा प्रश्न आहे. त्याच्यावर नियंत्रण होण्यासाठी लायसन्सींग होणे आवश्यक आहे. जे ॲथोराईज फेरिवाले आहेत त्यांना लायसन्स राहणे अपेक्षित आहे. तर ती कार्यवाही आपल्या प्रशासनाकडून अंतिम होणे अपेक्षित आहे. आणि ज्याठिकाणी ना फेरिवाला झोन आहे. त्या ठिकाणी कोणतेही लोक बसले नाही पाहिजे. यासाठीसुध्दा रेग्युलेशन सुट्टीच्या दिवसातसुध्दा चालू राहणे अपेक्षित आहे. त्यासाठी सन्मा. श्री. दिवटे साहेबांशी चर्चा केलेली आहे की, एक महिन्यामध्ये याचे नियोजन करुन, गटनेत्यांच्या बैठका घेउन या बाबतीत स्ट्रॉंगली कार्यवाही केली पाहिजे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

नियोजन करायची काय गरज आहे. तुमचे क्षेत्रिय अधिकारी आहेत.

**शरद पाटील :-**

एक नगरसेवक नांव घेउन सांगतो की, अमुक अमुक जागेवर गाडी आहे ती गाडी आपले अधिकारी, आपले कामगार उचलत नाहीत. म्हणजे नाव घेउन सांगतात तरी गाड्या का उचलत नाहीत? म्हणजे हे सगळे उचलायला आणि बंद करायचा ठेका नगरसेवकांनीच घेतला आहे का?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

प्रत्येक विभागाचे क्षेत्रिय अधिकारी कोण आहेत त्यागचे याच्याबद्दल काही कर्तव्य आहे की नाही? पण हे चुकीचे आहे.

**शरद पाटील :-**

आमचे सगळे प्रभाग अधिकारी आले आहेत का? ते मिटींगमध्ये का येत नाहीत? तुम्ही त्यांना बोलवत नाही का? ते कोणत्याच मिटींगला नसतात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याची नोंद घेउन संबंधितांना सेक्शन ५६ खाली नोटीस देउन खुलासा मागविला जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, जो प्रश्न विचारलेला आहे. तीन वेळा निविदा मागवूनसुध्दा अपेक्षित रक्कम मिळालेली नाही......

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, या स्टँन्डीगच्या सभेला बरेचसे अधिकारी कमी आहेत. कारण प्रत्येक अधिका-यांना माहित आहे की, आज मिटींग आहे. ते इकडे मिटींगला येत नाही. त्याच्यावर काय कार्यवाही होईल ते आम्हाला सांगा. प्रत्येक मिटींगला बोंब मारायला आणि त्यांना वाचवायचे.

**सुनिता पाटील :-**

मागच्या मिटींगला त्यांना विचारले तर बोलतात की, मिटींग आहे हे मला माहित नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, माझे दोन प्रश्न आहेत.

**तुळशिदास म्हात्रे :-**

दोन-चार प्रश्न विचारण्यापेक्षा मी महत्वाचा प्रश्न सांगितलेला आहे. पंधरा वर्षाचा निकष अटीशर्तीमध्ये लावा.

**ध्रुवकिशोर पाटी**ल :-

सन्मा. सदस्य श्री. तुळशिदास म्हात्रे साहेब, मागच्या वेळेला तुम्ही मा. स्थायी समितीचे सभापती होते तेव्हा तुम्ही हेच रुलिंग दिले होते. त्याच्यावर काय झाले का? नाही झाले. मग हे कशाला पास करायचे? कशाला इम्प्लीमेन्टेशन करायचे? ते कार्यवाही करतच नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आपण हे विचारा की, का करत नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जी टिपणी दिलेली आहे. एक महत्वाची गोष्ट सांगतो. पहिली गोष्ट की, तीन वेळा निविदा मागवली असतानासुध्दा अपेक्षित रक्कमेपेक्षा कमी आलेली आहे. असे असताना पुढचे पाउल काय? यापूर्वी अशी निविदा आली होती का? त्यावेळी काय निर्णय घेतला? प्रशासकीय अधिका-यांनी याचा उल्लेख टिपणीमध्ये केलेला नाही. तुम्ही जर तिन्ही निविदा बघितल्या तर पहिल्या निविदीमध्ये ३६ लाख, भाईंदर पश्चिम, दुस-या निविदेमध्ये ४० लाख म्हणजे ३६ वरुन ४० झाले. म्हणजे ४ लाख वाढले आणि दिवसाचे अंतर एक महिन्याचे आहे. २८/०८ आणि ०८/०९ आणि तिसरी २५/०९ निविदा २४/१० म्हणजे २६ दिवसाचा फरक आहे. त्यामध्ये ६० लाख झाले. म्हणजे ३६ ते ६० म्हणजे २४ लाखाचा फरक दिड महिन्यामध्ये झाला. म्हणजे २८/०८ ला जो टेंडर काढले त्यामध्ये ३६ लाख आणि तोच मणूस दिड महिन्यानंतर ६० लाखाचे टेंडर भरतो. म्हणजे शेवटी या शहराला ठेकेदारांना फक्त गिरवी ठेवायचे आहे का? माझे असे मत आहे. म्हणजे एक महिन्याच्या फरकामध्ये महापालिकेला२४ लाखाचा फरक येतो. तो किती मोठा फरक आहे. एक तर प्रशासनाने टिपणीमध्ये काही दिलेले नाही. आमची ताकद नाही. म्हणून ठेका देउन टाका. प्रशासनाचे हेच म्हणणे आहे का? उद्या शहरामध्ये सफाई कामगारांनी हडताळ केली की, आम्हाला बोनस द्या. आम्ही काम करत नाही. मग तेव्हा प्रशासनाने हातावर हात धरुन बसायचे का? म्हणजे ठेकेदार वसुल करणार नाही. पण तुमच्याकडे काहीच पर्यायी व्यवस्था नाही. शेवटी प्रशासकीय अधिका-यांना शहराचे नुकसान करायचे आहे का? उद्या आरोग्यामध्ये असाच विषय झाला की, पगार वाढवा. आम्ही काम करत नाही. म्हणजे तुम्ही आरोग्याची दखल घेणार नाही का? पगार वाढवून द्या हाच निर्णय देणार आहात. म्हणजे तुम्ही आमच्या नगरसेवकांना किती वेळा असा निर्णय घ्यायला बांधिल आहे? ही परंपरा चुकीची आहे. जे कोणी असतील त्यांनी सविस्तर माहिती द्यावी. आम्हाला कुठे अडवू नका.

**मा. सभापती :-**

तीनदा निविदा मागवून त्या लोकांनी ठेवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यापूर्वी सुध्दा तीनदा निविदा मागविल्यानंतर एक निर्णय झालेला आहे. त्याचा टिपणीमध्ये उल्लेख का केला नाही?

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, याच्या अगोदर निविदा मागविल्यानंतर कमी आल्यावर त्याच्यावर अंतिम निर्णय झालेला आहे. त्याचा उल्लेख त्यांनी करायला पाहिजे. आम्हाला जे माहिती नाही ते माहिती करुन द्यायला पाहिजे की, याच्या अगोदर हा निर्णय झालेला आहे.

**अजित पाटील :-**

निर्णय हा भाईंदर पश्चिम आणि भाईंदर पूर्वेच्या भागाशी संबंधीत आहे. त्याची सविस्तर टिपणी आम्ही दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एका बाजुला आम्हाला ठेकेदाराने धमकी दिलेली आहे. ही बाब तुम्ही आम्हाला लक्षात आणून दिली.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

स्पष्ट दिलेले आहे. ठेकेदाराने धमकी दिलेली आहे की, आम्ही काम करणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उद्या आरोग्य कर्मचारी हडताळवर गेले. मग तुम्ही लोकांना सांगणार की, तुमचे डबे तुम्हीच साफ करा. कचऱ्याची तुम्ही विल्हेवाट लावा. ही प्रशासनाची जबाबदारी नाही.

**अजित पाटील :-**

मी तुम्हाला माहिती देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मागचा जो ठेकेदार आहे. त्याला आपण किती महिन्यांची मुदतवाढ दिली?

**अजित पाटील :-**

ऑगस्टपर्यंत दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ॲप्रोक्झेमेटली किती महिने?

**अजित पाटील :-**

ऑगस्टपासून आत्तापर्यंत चार महिने दिली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्या अगोदरसुध्दा त्याला मुदतवाढ दिलेली आहे. त्याला बहुतेक दोन वेळा मुदतवाढ दिलेली आहे. म्हणजे त्या गोष्टीला किती महिने झाले?

**अजित पाटील :-**

सहा महिने झाले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझ्या अंदाजाप्रमाणे हा ठेकेदार सहा महिन्यापेक्षा जास्त काळ वसुली करतो. तो किती प्रमाणे करतो?

**अजित पाटील :-**

मंजूर रेटप्रमाणे करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण किती प्रमाणे.

**अजित पाटील :-**

७२ लाख.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर ती ७२ लाखाप्रमाणे वसुली करतो. मग तो आत्ता का नाही म्हणतो.

**अजित पाटील :-**

ते आम्हाला काय माहिती.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आम्हाला काय माहिती म्हणजे?

**मा. सभापती :-**

आपल्याकडे केलेली वसुली आलेली आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्याची ७२ लाखाप्रमाणे वसुली आलेली आहे आणि त्यानुसुध्दा टेंडर फॉर्म नेला होता. मग त्याने का टाकला नाही? साहेब, तुम्ही महानगरपालिकेचे जबाबादार अधिकारी आहात. तुम्ही महापालिकेच्या हिताचे बघता. मग तुम्ही त्याला का बोलावले नाही? त्याला विचारले पाहिजे की, त्याच्यावर कुठला दबाव आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यानंतर महानगरपालिकेला ८० लाखाबाबत पत्र आले की, मी ८० लाखामध्ये भाईंदर पश्चिमेला ठेका घेतो.

**एस. ए. खान :-**

टेंडर भरले आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टेंडर नाही. नंतर त्याला माहिती पडले की, बिलामध्ये गेलेले आहे. तरी त्याला शेवटी वाटले की, माझे टेंडर चुकीचे आहे. त्याने पत्र दिलेले आहे. त्याला उत्तर दिलेले आहे का? त्याला उत्तर दिले पाहिजे की, तु केले हे चुकीचे आहे. त्याने ८० लाखामध्ये. याच्या वाटाघाटी करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

टेंडर गेल्यानंतर आपण करु शकत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टेंडर गेल्यानंतर त्याने पत्र दिले हे चुकीचे आहे. हे मी ही सांगतो. पण शेवटी त्याने पत्र दिले आहे ना. त्याने पत्र दिले हे रेकॉर्डवर आहे. तोच ठेकेदार आहे. त्याने कमी टेंडर भरला आत्ता तो जास्त सांगतो किंवा मोठी रक्कम सांगतो. साठचे ऐंशी लाख म्हणजे २० लाखाचा फरक झाला.

**एस. ए. खान :-**

ते चुकीचे होईल ना? डिस्क्लोज झाल्यानंतर .......

**शरद पाटील :-**

त्याला द्या असे बोलत नाही.

**एस. ए. खान :-**

मग त्याला वाटाघाटीला कशाला बोलवायचे?

**तुळशिदास म्हात्रे :-**

त्याने मुद्दाम दिले असेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मुद्दाम दिले असेल मग त्याला बोलवा. त्याला द्या असे मी बोलत नाही. पण यापूर्वी असा एक निर्णय झालेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. श्री. खतगावकर साहेब, मला तुम्ही सांगा. जर समजा हे टेंडर झाले आणि त्या कॉन्ट्रॅक्टरने परत तुम्हाला सांगितले की, माझ्याकडून चुकी झाली आणि मी ८० लाखामध्ये घ्यायला तयार आहे. तर महापालिकेचे २० लाख रुपये वाढतात. मग तुम्ही हा डिसीजन का घेत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील साहेबांना मी खुलासा करू इच्छितो ज्या ठेकेदाराने पत्र दिले होते. त्याची शेवटची जी निविदा मागविलेली आहे. त्याच्यात जास्तीचे दर नाहीत. दुस-या ठेकेदाराचे जास्तीचे दर आहेत. तर आपण कोणाला एन्टरटेन करणार?

**मा. सभापती :-**

त्याने निविदा भरलेली आहे ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याने तिस-या वेळेस कमीची निविदा भरली आणि ओपन झाल्यानंतर त्याने पत्र दिले अशी परिस्थिती आहे. त्यांना संधी होती त्याच्यात त्यांनी कमी दर भरले हा प्रश्न आहे.

**मा. सभापती :-**

याच्यापुढे ज्या बाजारवाल्यांनी बाजार घेतलेला आहे. त्याची किती थकबाकी आहे आणि आली की, नाही किंवा ते या टेंडरमध्ये सहभागी आहेत त्यांना द्यायचे? वसुली आली की नाही ते मला सांगावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मागची थकबाकी वसुल झाली का? जे काही येणे होते त्यांनी पैसे भरले का?

**अजित पाटील :-**

भाईंदर पश्चिमेची श्री. देविदास किणी यांची पुर्ण रक्कम आलेली आहे आणि भाईंदर पुर्वेची श्री. अनिस खान यांची ७ लाख रूपये बाकी आहे.

**शानु गोहील :-**

पश्चिमेची किती होती?

**अजित पाटील :-**

क्ष्यांची पाच महिन्याची ॲडीशनल अमाउन्ट ३२ लाख रूपये आहे आणि श्री. अनिस खान यांचे पुर्वीचे टेंडर आहे. त्याची रू. ७ लाख येणे बाकी आहे.

**प्रशांत पालांडे :-**

ती वसुल होईल का?

**अजित पाटील :-**

होईल.

**मा. सभापती :-**

याच्यापुर्वी आपण देत होतो. त्यावेळेस आपण दोन महिन्यांचे पैसे ॲडवान्स घेउन आपण देत होतो. मग मुदतवाढ झाली त्यावेळेस तुम्ही घ्यायला पाहिजे होते.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी प्रश्न विचारला होता की, याच्या व्यतिरिक्त आपण नंतर काय करतो. त्याचे उत्तर द्या.

**अजित पाटील :-**

मिरा रोड भागातील टेंडर पुर्वी काढलेले होते. त्याची २००६-०७ ची बाजार भावाची किंमत ९१ लाख रूपये होती. दहा टक्के वाढवून १ कोटी १० लाख रूपयांचे टेंडर काढलेले होते. हे टेंडर १ लाखाच्या अगेन्स्ट पहिले टेंडर ६८ लाख १० हजार १५१ ला आले. नंतर ते कमी दराचे असल्याने परत रिकॉल केले. दुसरे टेंडर काढले ते ७०,०१,०००/- रू. आले. त्यानंतर ते सुद्धा कमी असल्याने परत टेंडर काढले. तर ७०,०९,९९९/- आले नंतर निगोसिएशन करून तिसऱ्या अटेम्प्टमध्ये त्यांनी ७२ लाख केले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याला निगोशिएशन केले मग यांनी भरल्यानंतर पत्र आल्यावर याला का बोलावले नाही.

**अजित पाटील :-**

तो हायस्ट वाला होता. तीन वेळा प्रयत्न करून टेंडर कॉल केल्यानंतर आपल्याकडे ७२ लाख ही बोली आली. ती बोली आपल्या १ कोटी ११ लाखाच्या अगेन्स्ट आलेली आहे. तीन वेळा केल्यानंतर मा. स्थायी समितीसमोर विचारार्थ ठेवला असता मा. स्थायी समितीने त्यावेळेला असा निर्णय घेतला की, याला परत बोली पद्धतीने मागविण्यात यावे. ते टेंडर बोली पद्धतीने कॉल करण्यात आले. जाहिर नोटीस देउन सर्व संबंधितांना मा. आयुक्त साहेबांसमोर बोली पद्धत झाली. त्यावेळी ते ७३ लाख रूपयांवर झाले. ७३ लाख रूपयांवर झाल्यावर तीन वेळा टेंडर काढल्यानंतर चौथ्या वेळा बोली पद्धतीने प्रयत्न केल्यानंतर ७३ लाखाचे टेंडर मा. स्थायी समितीपुढे शिफारस केले असता स्थायी समिती ठराव क्र. ६९ दि. २०/०६/२००७ रोजी केले. तीन वेळा प्रयत्न करून चौथ्यावेळा जी बोली आहे. त्याला मान्यता देउन वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सुचक कोण आहेत?

**तुळशीदास म्हात्रे :-**

चौथ्या वेळेला कितीचे आले?

**अजित पाटील :-**

७३ लाख.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, सुचक कोण आहेत ते जरा सांगा?

**अजित पाटील :-**

सुचक आहेत श्री. परशुराम म्हात्रे आणि अनुमोदक श्री. रतन पाटील आहेत. ठराव सर्वानुमते मंजुर आहे.

**मा. सभापती :-**

मी अधिकाऱ्यांना सांगतो की, याच्या पुढच्या मिटींगला याचा पुर्ण गोषवरा द्यावा की, वाढीव रक्कम कमी का आली? आणि सर्वांना गोषवारा द्यावा. पुढच्या मिटींगला रितसर माहिती द्या आपल्याला कशासाठी रक्कम कमी आलेली आहे? त्याचे कारण काय आहे? तुमच्याकडे लेटर आले असतील ना?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, याच्यामध्ये असेपण आहे त्यांनी असे म्हटले की, महानगरपालिकेकडे सध्या अपुरे कर्मचारी आहेत. अपुऱ्या कर्मचाऱ्यांकडून बाजार वसुली करणे शक्य होणार नाही. तरी सदर प्राप्त निविदेवर योग्य तो निर्णय होणेस विनंती आहे. तुम्ही आमच्यावर निर्णय कशाला देता? तुम्ही पहिला निर्णय घ्या आणि मग आमच्याकडे आणा. उद्या कोणी कोर्टामध्ये गेले तर तुम्ही असे सांगणार की, आम्ही निर्णय घेतलेला नाही. सोळा सभासदांनी निर्णय घेतलेला आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. श्री. अजित पाटील, इकडे आम्हाला धमकी कशाला दिली आहे. आम्ही शंभर माणसे आणून वसुली करतो.

**नयना म्हात्रे :-**

नाही तरी आपले कर्मचारी इकडे दोन बसतात तिकडे दोन बसतात आपल्याकडे कर्मचाऱ्यांची कमी नाही. आपल्याकडे खूप कर्मचारी आहेत. त्यांना याच कामाला लावा. मा. सभापती साहेब, आपल्याकडे आत्ता जे सी.एफ.सी. मध्ये कामगार आहेत. त्यांचे देखिल या डिसेंबरला मुदत संपते. त्यांना मुदत वाढ द्यायला पाहिजे की नको? कारण जे संगणकमध्ये काम करतात त्यांच्यानंतर ५० लिपिक आहेत. साहेब, त्या दिवशी मा. महासभेला विषय होता. त्यांचे डिसेंबरला पुर्ण झाले. त्यांना मुदतवाढ द्यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

आपण त्यांना मुदतवाढ देउ शकत नाही. परत आपण टेंडर काढू शकतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महासभेमध्ये त्यांचा विषय घेतला होता. पण सभा तहकुब झाल्याने तो झाला नाही.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, आत्ता सभा कधी होईल त्याचा काही ठिकाणा नाही. आत्ता त्यांचे वर्ष पुर्ण झाले आणि साहेब, जे ५० लिपिक आहेत त्यांचा विचार करा. त्यांना चार चार महिने पगार दिलेला नाही. मग तुम्हाला वसुली करायला ते ५० लिपिकच लागतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मॅडम, एकीकडे हाउसमध्ये चर्चा अशी होते की, आस्थापनेचा खर्च वाढतो आणि दुसरीकडे म्हणता की ५० लिपिक घ्या.

**नयना म्हात्रे :-**

पण ते तुमची वसुली करतात ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वसुलीमध्ये एक सुद्धा नाही.

**नयना म्हात्रे :-**

खुप आहेत. तुमच्या खालच्या अधिकारी आहेत त्यांना जरा विचारून बघा. तुम्ही जरा चौकशी करा. एकपण नाही असे कसे बोलता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी जबाबदारीने बोलतो. ते ५० लोक वसुलीमध्ये नाहीत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. खतगांवकर साहेब, तुम्ही आता बोलले की, डेप्युटी कमिशनर म्हणून बोलतो पण तुम्ही एक विचार करा ती मुले सहा महिने बिन पगारी काम करतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ती मुले ठेकेदाराकडून आपल्याकडे कार्यरत होती. त्यांची मुदत संपल्यानंतर त्याची जबाबदारी फायनल झालेली आहे. ठेकेदाराला मा. आयुक्तांनी नोटीस दिलेली आहे की, तुमचा ठेका बंद झालेला आहे. आत्ता ती मुले काम करतात म्हणजे किती गैर कायदेशिर आहे? ते तुम्हाला मान्य आहे. ठेकेदाराकडे जी मुले होती. मा. आयुक्तांनी ठेका रद्द केला म्हणून ठेकेदाराला कळविल्यानंतरही ती मुले काम करतात म्हणजे काय?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कोणाच्या अंडर काम करतात?

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ते का काम करतात?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते काम करतात. उद्या इकडून पेपर गहाळ झाले तर जबाबदारी कोणाची आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जे कोणी काम करून घेतात त्यांची जबाबदारी आहे. त्यांना याची कल्पना आहे की, हे लोक कमी केलेले आहेत.

**सुनिता पाटील :-**

आत्ता महानगरपालिकेतच काम करतात ना?

**शानु गोहिल :-**

अभी आप ऐसे भी बोलते हो और वैसे भी बोलते हो। आप दोनो तरफ से बात करते हो।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माझी सभागृहाला विनंती आहे की, तुम्ही तुमच्या भावना स्पष्ट मांडाव्यात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमच्या भावना अशा आहेत की, त्या मुलांना तुम्ही परत टेंडरमध्ये ॲक्सेप्ट करून घ्या. त्या मुलांना तुम्ही वाऱ्यावर सोडू नका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माझ्याकडे कोणाची तरी मागणी येउ द्या की, मला हे कर्मचारी लागतात. एकाचीही मागणी नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्या सौ. सुनिता पाटील यांचे पत्र आहे. माझे पत्र आहे. सगळ्यांचे पत्र आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही देणे वेगळे आहे. संबंधित जे काम घेतात त्यांनी द्यायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आत्ता तुमच्यासमोर विषय आला आहे की, अपुरा कर्मचारी वर्ग आहे. हे श्री. अजित पाटील साहेब म्हणतात. याचा अर्थ असा की, प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये अपुरा कर्मचारी वर्ग आहे.

**नयना म्हात्रे :-**

सन्मा. आयुक्त साहेब, श्री. अजित पाटील यांनी सांगावे की, त्यांच्याकडे जी रूपाली नावाची मुलगी काम करते तीला पगार कोण देतो ते तुम्ही सांगावे. तुमची फाईल घेउन ती मा. महापौरांकडे आलेली. तुम्ही तीला बोलत होते की, मला हा पेपर दे तो पेपर दे. तुम्ही तिला पगार देता का? मा. सभापती साहेब, हा विषय पुढच्या मिटींगला तुम्ही नक्की आणा. कोणावर तरी अन्याय होतो आणि मा. आयुक्त साहेब, सांगलीवरून आणून परमनन्ट करतो, सातऱ्यावरून आणून परमनन्ट करतो. अशी कीती लोक आहेत. माझे ह्याच्यावर पत्र आहे. परमनन्ट करण्यासाठी त्यांना सगळे चालते आणि ठेकेदाराकडे ठेका पद्धतीने घेणे त्यांना आवडत नाही. तेव्हा त्यांचा बजेट फुगतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. श्री. खतगांवकर साहेब, सगळ्यांच्या भावना अशा आहेत की, ते जे कर्मचारी आहेत त्यांना.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

विषय असा आहे की भावनात्मक बोलायला खुप बोलू शकतो.

**नयना म्हात्रे :-**

५० लिपिक तुमच्याकडे काम करत नाहीत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ठेका रद्द झाल्यानंतर ते कसे काम करतात.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही तुमच्या प्रत्येक अधिकाऱ्याला विचारा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण साहेब एक सागा, उद्या त्या डिपार्टमेंटमधून काहीतरी गायब झाले तर जाबाबदार कोण आहे? ते कोणावर येणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

जो कोणी अधिकारी असतो तो जबाबदार असतो.

**शरद पाटील :-**

आम्ही तुमच्याकडे एवढाच विषय मांडतो की, त्यांना ठेकेदार घेउन पुन्हा मुदतवाढ द्यावी.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, हा विषय पुढच्या मिटींगला आला पाहिजे.

**मा. सभापती :-**

कोर्टाचे आदेश आहेत की, आपण वाढीव देउ शकत नाही.

**नयना म्हात्रे :-**

सुप्रिम कोर्टाचा निर्णय असा आला आहे की, तुम्ही ठेक्याने घेउ शकता. परमनन्ट घेउ शकत नाही. साहेब इकडे कोण सदस्य बोलला की, त्यांना परमनन्ट करा. प्रत्येक सदस्य हेच बोलतो की तुम्ही त्यांना कामावर घ्या.

**मा. सभापती :-**

ठेका पद्धतीने घेवू शकतो. तर त्यांना घेवू या.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आयुक्तांना चौकशी लाव की एवढे लोक परमनंट कशी झाले?

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब, आत्ता श्री. खतगांवकर साहेब म्हणाले की, त्यांना प्रस्ताव पाहिजे मग आपण प्रस्ताव देवू.

**नयना म्हात्रे :-**

संगणकांचे या महिन्यामध्ये वर्ष पुर्ण झाले त्यांना आपण ठेका वाढवून द्यायला नको का? ५० माणसे घ्यायची त्यावेळेला गेल्या स्टँडींगला निर्णय झाला की, ८० घ्या मग ठेका कॅन्सल कोणी केला?

**प्रशांत पालांडे :-**

त्या मुलांकडे तुमच्या अधिकाऱ्यांचे लेटर आहेत की, ह्या ह्या मुलांची गरज आहे. तुम्ही मुदत वाढवून द्या.

**मा. सभापती :-**

सर्वांना नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देउन आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली म्हणून धन्यवाद देतो आणि आजची सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**